नं. २

विषय
नाटक
संग्रहालय क्रमांक
३७५

म. ग्रं. सं. ठाणें
लेखक दामोदरपंत क
पुस्तकाचें नांव श्री कृष्णा

म. ग्रं. सं. ठाणें
विषय नाटक
सं. क्र. ~~३५~~ ३७५

२

नाटक

नोंद नाही
हजेपेठे
१७/१०/८८

| …वें — … | प्रती |
|---|---|
| विनायक गोपाळ राव | १ |
| मोरेश्वर रघुनाथ जी | १ |
| दिनानाथ रामचंद्र जी | १ |
| रामचंद्र सदोबा | १ |
| त्र्यंबकराव सदाशिव | १ |
| नीळकंठराव नारायण | १ |
| रघुनाथराव राघोबा | १ |
| विठ्ठल नारायण | १ |
| विठ्ठल यशवंत | १ |
| लक्षुमणराव राघोबा | १ |
| रामचंद्र सदोबा | १ |
| (बाहेर गांवचे) | |
| सदाशिवराव भिडे | १ |
| दाजीसाहेब | १ |
| विनायक यशवंत | १ |
| दिनकरराव अण्णा | १ |

| नावें — … | प्रती |
|---|---|
| रा॥ रामचंद्रराव रघुनाथ | १ |
| आपाजी मोरेश्वर | १ |
| लक्षुमण नृसिंहराव | १ |
| आपाजी सदाशिव नायीक | १ |
| नरोत्तमराव | १ |
| नरहरराव गुर्जर | १ |
| गोविंद भगवंतराव | १ |
| लक्ष्मीराम दलपतराम | १ |
| भवानीशंकर राघोबा | १ |
| विश्वेश्वर सदाशिव | १ |
| आपाजी मुकुंद | १ |
| कृष्णराव नारायण | १ |
| तात्यासाहेब | १ |
| सदाशिव रामचंद्र | १ |
| मल्हारराव | १ |
| केशवराव पंताजी | १ |
| अच्युतराव | १ |

| नांवें —— | प्रती | नांवें —— | प्रती |
| --- | --- | --- | --- |
| रा॥ बाबाजीराघोबा | १ | रा॥नारायणअमृत | १ |
| बळवंतरावभाऊ | १ | परशुरामभाऊ | १ |

## सूचना

### गीति

सूज्ञेंकृपाकरूनया. दोषादोषांशिं मनु
नीध्यावें,॥ सेवाअज्ञाचीती. स्वीकारूनि
सुयशातेंपदरिंध्यावें ॥१॥

## आशिर्वाद

### गीति

ईश्वरकृपावलोकन. सदयालुपणेंसदाश्र
यांवरितें॥ होवोविलयाजावो. सर्वस्वी
दैन्यवाअसुखजरितें॥१॥
तनयसदासियविनती. परिसावीईश्व
राकरूनिदया. नकोदुजेंतेमजला. हेंतू
नचिअन्यतोखचितसदया॥२॥

# दामोदरकविकृत

# श्रीकृष्णलीलाआख्यान

विश्वंभरसदाशिवछत्रे

यांणी

यथामतीनेंशुद्धकरून

मुंबईयेथें

ज्ञानबोधकछापखान्यांतछापिलें

मार्गशीर्षमास

शके१७८२

सन१८६०

१३२
मराठी ग्रंथ संग्रहालय

# श्रीकृष्णलीलाआख्यान

राजश्री विश्वेश्वरस दाशि वछ-ध्येयांशिं

विनंती विशेष, मी स्वकपोल कल्पित, किंवा, भागवत, भारत, इत्यादि मोठमोठ्या ग्रंथांचा आधार धरून जितकीं लोक मनरंजक नाटकें केलीं आहेत, तितकींही माझा मना तून छापून प्रसिद्ध करावीं असा हेतू व, त्याप्रमाणें, हरिश्चंद्र आख्यान छापून प्रसिद्ध ही केलें, परंतु त्यांतील कवितेमध्यें कांहीं कथारणुक करणें, आणि शुद्धाशुद्ध पाहणें, हीं, दोन कृत्यें अवश्य आहेत, असें जाणून सर्व आख्यानें आपणाकडे पाठवून देण्याचा निश्चय करून सांप्रत कृष्णलीला आख्यान पाठविलें आहे, हें, आपण शुद्ध करून तें आपले मनाप्रमाणें झाल्यावर, सर्वांस प्रसिद्धी करिता छापवावें, मजवर आपले फार उपकार होतील बहुत कायलिहिणें लोभाभिवृद्धी असावी हे विनंती

तारीख १५ वी माहे नोवेंबर सन १८६० } दामोदरपंत.

रा। दामोदरपंत याशिं

विनंती विशेष, आपलें, पत्र अत्सादरें स्वीकारिलें, व, त्या प्रमाणें मी करण्यास सिद्ध आहे, सांप्रत आपण

पाठविलेली कृष्णलीला आख्यानाचीप्रत मी यथामतीनें शुद्ध करून स्वच्छ, व सुबोध रीतीनें छापून प्रसिद्ध केली आहे. छंदोभंग इत्यादि दोष मागील ग्रंथात जे कांहीं राहिल्या सारिखे आहेत, त्याविषयीं यास्थळीं चांगली योजना करून, या ग्रंथांतील तें ही दोष यथामतीनें काढून टाकिले आहेत.

तारीख १ ली माहे डिसेंबर सन १८६० } विश्वरसदाशिव छत्रे

## विनंती

हरिश्चंद्र आख्यानाचें पुस्तक छापून सर्वांस प्रसिद्ध झालें, व त्यास बहुतांनीं, आपला उदार आश्रय देऊन कर्त्याची मनेच्छा पूर्ण केली, यावरून मला जो संतोष झाला, तो विस्तारें लिहिण्यास नको, सांप्रत दामोदर कवीचा मनोगतावरून, परोपकार बुद्धीनें हरिविजयांतील कृष्णलीला नामें नाटकग्रंथाची प्रसिद्धी केली आहे. व हरिश्चंद्र आख्यानांत प्रथम कविता, नंतर नाटक पात्रांची भाषणें, अशीं निरनिराळीं लिहिलीं होतीं, तीं, शैली बदलून कविता लिहिल्यानंतर लागलेंच त्याखाली त्याचे सुबोध भाषण लिहिण्याची योजना यांत ठेविली, ही रीती, सर्वांची समजुत होण्यास फारच उपयोगी

पडेल, म्हणून योजिली आहे. व, यांत गणपती, सरस्वती, व विदूषक, सूत्रधार संवाद, इत्यादि प्रकार हीं सर्व कवितारूपाने प्रदर्शित केले आहेत.

या पुस्तकास बहुतानीं आपला उदार आश्रय दिला, येणेकरून मला फार आनंद झाला, व, त्यासाठीं मी सर्वांचा फार आभारी आहें.

विरेश्वर सदाशिव छत्रे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे

श्री

# श्रीकृष्णलीला आख्यान नारकाचारीती प्रमाणे

प्रारंभ

## सूत्रधाराने, नमन केल्या नंतर. विदूषका ने पडद्यांतून बाहेर यावे, व बोलावे.

" कायहो कटकटहो. घरीं, दारीं, वनांत, रस्त्यांत"
या गाण्यानें, व, वाजविण्यानंतर कपाळदुखी आण"
ली, महाराज, एकक्षणभर जर उगीच राहाल तरभा"
डें काय घ्याल?"

## सूत्रधार.

"अरे तूं आहेस कोण, आलास कुठुन, व अशीं वे"
ड्या सारिखी भाषणें कां करितोस! आह्मीं तर जगदी"
श्वर भजनांत निमग्न आहों."

## विदूषक.

"बोललां वचन तें खरें, व, मलाही माहित आ"
हे कीं, ज्याची संपत्ती जाते, जो विरक्त असतो, जो"
आपल्या कर्मांत फसला जातो, ज्याचें धन जातें, किं"
वा ज्याशी बायको चा (वेश्या तर तुम्हास मातुश्री"
सारिखी असेल, आणि परस्त्री बोलायास नकोच)"

"अमद्दा होतो, इतक्यांसगृहस्थांस, अगर भिका"
"र्‍यास हरिभजनाशिवाय गत्यंतर नाहीं. ते ह्यांतु"
"म्हीं आहांतरी कोण, हें मला पूर्वी कळवा. आणि"
"मग माझें मन वळवा. मला विचारितें, त्यास मला"
"नट असें म्हणतात. मी आलों गौडबंगाल्यांतून. व, ये"
"थ्यार्ने कारण इतकेंच कीं, आमचा सूत्रधार कुठें पळा"
"ला आहे, यास धरावा हा हेतू, हा गोणता पाहा- (द्वा"
"रवावा.)

## सूत्रधार.

### ओवी

वरळूं नको जैसा विक्षिप्त ॥ दिससी मज लामा
झा आप्त ॥ करूं नको बुद्धी प्रदीप्त ॥ साह्यत्व दे
यीं मज लागीं ॥ १ ॥

" अरे नटा! तूं तर मला केवळ आप्तसा दिसतो"
"स, आणि तूं फारच बुधिमान आहेस, आतां आप"
"ली बुद्धी अधीक न खर्चितां माझ्या कर्मांत साह्य"
"व्हावेस मी जो तुझा सांडलेला सूत्रधार तोच आ"
"हें. अशी तुझी खात्री होयील.

## विदूषक

"(गोणताउघडून) आंतबसा! बसाकिंहो! अ"
"जुनकांबसाना. तुमच्यापेक्षां कांहींचर्वी माझाअं"
"गांतजास्ती आहे, मनापानेल तसें करीन, आणि"
"मलामाहित नाहीं कीं तुम्हीं काय चोरी, चाहाडी,"
"किंवा कुंटणकी. अथवा धंदानरी कोणता करणा"
"र. तर ध्या तुमचें सार्थक करावें, अम्ही म्हटलेंच्य"
"णजे घमेंडा नंदन, चारमाणसांचें ओझेंखांद्यावर"
"ठेविलें तरमात्र निमुटपणें चालतें होऊं. दुसरें स"
"र्वे ओ म्हटल्यासठो."

## सूत्रधार.

" अरे बरळत बरळत कितीलांब चाललास."
"हो, मला येथें नाटक करून लोकांचें अंतःकरणाचा"
"संतोष करणें आहे, त्याला तूं मदत कर, म्हणजे"
"झालें"

## विदूषक.

" ठीक आहे. पाऊस आला विरल झालाक"
"शास आचें दूर येथेंच माझें पंढर पूर, तद्वत कोण"
"ते नाटक, व, कोणत्या प्रकारानें तुम्हीं करणार तें"
"मला सांगावें. व, पूर्वी कोणत्या विषयपात्रांचें स्म"

"रथा करणार, तेंही सुचवावें, मगमला कायकर"
"तों तें मी करीन, व इथें माझी पंढरीपिकली आहे"
"असें मी समजेन."

## सूत्रधार.

" अरे मी कृष्णलीलाआख्यान नाटकरीतीनें"
" करण्याचा निश्चय केला आहे, आणि आपुले"
" आरंभिलेल्या कार्यास आराध्य पूजनावश्यकता"
" म्हणून, प्रथमतः नमनाचे चार अभंग म्हणून, नंत"
" र गजानन स्तुती करितों, त्यांही त्यांचा सन्मानयो"
" जने करितां साह्यभूत असावेंस.

## अभंग.

(येगेयेगेविठाबायी)

यावें यावें श्रीगजवदना, साह्यव्हावेंभक्त जना ॥१॥ कार्यारंभीतजलास्तविलें, जणु कार्यसिद्धिसगेलें ॥२॥ सर्वविघ्ननिवारणा, प्रार्थयेलतुजगजवदना ॥३॥ दामोदरकविध्यायीतुजला, अम्हांपावेंदीनदयाळा ॥४॥

## भाषण.

" हे सकलदैवताध्यक्षाः हे गजवदनाः का"
" यारंभीं, त्रिजगांतील सर्वदेव तुझी आराधना"
" करितात, अशी तुझी प्रसिद्ध कीर्ती जाणून ग्या"
" नाटकारंभीं तुझें स्मरण केलें आहे, तर हे विघ्नवि"
" नाशना; आम्हा दीनदासांवर दयाकरून यारंगणीं"
" यावें, व आमचा नाटककृत्यास येणाऱ्या अडचणी"
" निवारण कराव्या"

## विदूषक.

" कायहो: तुम्ही जें इतके बरळलेत, त्यांनम"
" ला कांहींच अर्थ वाटत नाहीं, कारण कीं, अशा"
" ठिकाणीं तुमचा गणपतीनें काय होणार! मी सांग"
" तों हेंजर ऐकलेंत, तर कार्यसिद्धी होयील.

## सूत्रधार.

" बरें नर बोल; अरे बालादपि सुभाषितं ग्राह्यं"
" अशाप्रमाणें, चांगली बुद्धी कुणाचीही ऐकणें आ"
" हे. बोल तुझी कांहोयीना.

## विदूषक.

" ऐका लोकानो, ऐका, सूत्रधारास मी बुद्धी सां"
" गतों हे उद्या नाकबुल जातील.

 भा-2

अभंग

येगेयेगे माझे प्रिये. हास्यवदनें निर्मळ हृदये ॥१॥ सर्व जना सुखकारके. रंगशीघ्र महारके ॥२॥ तुझे स्वरूप ते पाहून. वाटे जायिल देह भान ॥३॥ साह्य करी सूत्रधारा. आणि नयनी अश्रू धारा ॥४॥

विदूषक

भाषण.

" अगे माझे प्रियकर सखे, त्वां माझा संक"
"टांत पडलेल्या सूत्रधारास साह्य करावेंस, तुझें हा"
"स्यवदन पाहिल्यानेंच देहभान जायीलसें वाटतें"
" मग चार गोष्टी झाल्यावर, तो मृत्युलोकीं कशास"
"राहातो, तुझा सोबतिणी काशी, गंगी, सखी, तारी, लक"
"डी, इत्यादिकांस आणून कसेंही करून हें नाटक सि"
"द्धीस न्यावे. सूत्रधाराचा देह कष्टांतून सोडवा."
" सूत्रधार, आमचा विषयपात्रा बरोबर सर्व बकलांचा"
" जरमेळा या रंगणा मध्यें आला तर तुम्हास दु"
" खशी घेण्यास दुसरेकडे जाणें नको.

सूत्रधार.

"अरे कुबुध्दी सोड, व असे रंग टाकूनदे, आ"
"णि श्रीगणपतीची मी आराधना करीत आहें"
"तिकडे लक्ष दे; आणि आतां ते कैलासाहून येथें ये"
"तील, त्यांस मानसन्मान इत्यादिप्रकार या सर्वां"
"विषयीं योजना. चांगल्या रीतीनें ठेव.

विदूषक.

" बरेंतर: मरूपण चमत्कार अवलोकन करूं"
" आपल्यास काय एवढीं पंचाईत पडली आहे, जे"
"डोळ्यापुढें येईल तें पाहावें म्हणजे झालें.

सूत्रधार

(येरेयेरेगोविंदारामा)

येरेयेरेबाप्पारेगजवदना, शुभदायकतूं सर्वसुख
सदनारे॥ धृ॥ भक्तस्नेहाळा देवा एकदंतारे
त्रिजगिपूर्णतेसर्वतुझीसत्तारे, नसेसर्वां
शींतुझ्याविण त्रातारे ॥ ॥ सुरनर मुनि न
हर्निशी दिनि, स्मरतीतिनि वाणि, लागतीचर
णि, पापसंव्हरणारे गजवदना ॥ १॥

गोकुनीयाम्याअशीतुझी कीर्तीरे, धरि
लिमानं ती कींदर्शनाचिस्फूर्तीरे, केलिगण

रायातुजभक्तीविनंतीरे, दयाकरीभक्तजनांव रतीरे ॥३॥ रंगणिंयेउन, देयिवरदान, कीर तेंनिर्विघ्न, सदयहोउन, मिष्टकरीरसनारे ग जवदना ॥२॥

भाषण.

"हे गौरीतनया, हे सांब प्रियपुत्रा, नाटक कार्या"
"सजीं विघ्नेयेणार, तीं नयावी, व नाटक पात्रें अज्ञान"
"आहेत, त्यांस चांगली वाचाशक्ती यावी, याकरितां"
"आपली कीर्त्ती ऐकुन अम्हींही अल्प मतीनें आप"
"ली आराधना केली आहे, आतां आपण रंगभूमी"
"वर येऊन आमचे मनोरथ पूर्णकराल अशी आशा"
"मीबाळगितआहें, याजकरितां सत्वर येऊन कार्य सि"
"द्धी करावी.

नामस्मरण.

वक्रतुंडगणराज, जैजैवक्रतुंडगणराज, द.
भजनझाल्यावर, पडदा उघडल्यानंतर द्द
श्य व्हावें. व सूत्रधारानें नमनानंतर.

"नाटकाचार्यो, यासमयीं मी, नारद, तुंबरादि ग"
"ण गंधर्व मुखें, गायन श्रवणांत अतिनिमग्न अ

"सनां अकस्मात दुःखी करुणास्वर कर्णी आल्या"
"म्हणून मी या रंगभूमीवर आगमन केलें, आतां जी तु
ला विनंती करणें असेल, ती स्वस्थ मनानें कर, मा
झें मन सुप्रसन्न आहे.

## सूत्रधार

### श्लोक

दासावरी पूर्णकृपा असावी, सुबुद्धि बालांस प्र
तिभा घ्र द्यावी ॥ विघ्नासि संपूर्णपणें निवारी
होवा नयाभक्त किं सहकारी ॥१॥

### भाषण.

"हे विघ्नविनाशना, अम्हांवर कृपा करून"
"आपण रंगभूमीवर येणें केलें, आतां कृपा करून
"नाटकपात्रांस बुध्चातुर्य द्यावें, हीच प्रार्थना"
" आहे.

## गणपती

(गंगानाद्या नेंजाना)

दासा संतोषित मी झालों, सिद्धकारनजें वद
लों ॥ धृ ॥ अभय तुला नी विघ्न तुझें तें, नाटक स
तत कीं चालो, दासा ॥१॥ नाटक पात्रें सुरसकि

वदती, स्मर गुरू ऐकुनि डोलो ॥ २ ॥ दामोदर प्रभु तुह्मां सदा दित, स्वदयेनें प्रतिपालो, दासा सं ॥ ३ ॥

भाषण.

"हे भक्तश्रेष्ठा, तुझें नाटक निर्विघ्न चालावें"
"असा मी सुप्रसन्नमनानें. आशिर्वाद देत आहे"
"चिंता करूं नको." १

"दासा तुझीं नाटक पात्रें, अशी प्रौढपणानें"
"भाषणें करतील कीं तीं ऐकुन स्मरगुरु म्हणजे बृ"
"हस्पतीसही संतोष होयील." २

"हे बालका, तुम्हां सर्वांवर मी सुप्रसन्न आ"
"हें, असें जाणुन दामोदरप्रभू म्हणजे परब्रह्म भगवा"
"न तोही आपली कृपादृष्टी निरंतर ठेविल" ३

गीती.

ब्रम्हकुमारितें ध्यावें, येउनि निर्विघ्न तव करी कार्य ॥ तुजला दे बुद्धि देउनि, प्रौढ करी मान्य कीं गुणी आर्य ॥ १ ॥

भाषण.

"भक्ता तुला म्या तर आशिर्वाद दिला आहे,"

"परंतु हो सरस्वती, जिला ब्रम्हकुमरी असें म्हण"
"तात तिचें आराधन करावें म्हणजे तीरंगभूमीवर"
"येऊन तुझें इछिलेलें कार्य आशिर्वचन देऊन परि"
"पूर्ण करील, मीही तिलातशीच आज्ञा देतों, बरेंतर."
"आतां मला जाण्याविषयीं भक्तांचा निरोप असावा.

सूत्रधारानें निरोप देऊन गणपती गेल्या नंतर.

विदूषक.

" कायहो सूत्रधार, मला वाटतें कीं, इथें कांहीं
"वेळ विशेष दम धरला तर मोठा अनर्थ होयाल."
"अहो, तुम्हीं मला सांगीतलें कीं, मला नाटक करणें
"आहे. त्यास मदत करावीस. आणि तुम्हींतर असतां
"असतां, गौडबंगाली खेळ काढला आहे, आतां येथें
"ही असोंडेचा, स्थूल उदराचा, आंखुड मांड्याचा, अ
"सा उंदरावर बसून कोण पुरुष आला होता बरें?"
"असे उंदरावरले, व खेचरावरले, व वेडे वांकडे मनु
"प्य येथें येणार असले तर, नहाक माझ्या प्राणाचाना
"श होयील, म्हणून मला आज्ञा असावी.

सूत्रधार.

नं. ८८२

" अरे नया, आतां जो सभास्थानीं सुशोभित "
" झाला होता, तो कांहीं सामान्य पुरुष नव्हे, ज्यास "
" आदि देवत ह्मणतात. तो गणपती अरे बाबा! "
" त्याची हेळणा केलीस, म्हणून तूं आपल्याशीं "
" मुखांत मारून घ्यावयास हें तुला योग्य आहे "
" आतां पुढें चाळे न करितां उगीच उभा राहा, आणि "
" मी आदिमातेचें अराधन करीत आहें त्यावर लक्ष "
" देव काय चमत्कार होतो तो पाहा. "

## सरस्वतीप्रार्थना

### पद

जगदंबे माय भवानी, भगवती प्रणवरूपिणी ॥
तूं अशीर्वचन देवोनी, करि विघ्नाची तीहानी,
करि नाटकपात्रांशीं तूं सर्वमान्य कोमल
वचनीं ॥ चाल ॥ गातों हरिलीला आख्याना "
आख्याना " अंबे पाही कृपें तूं दीना, अहो दीना
वदवी तूं रादररचना अहो रचना ॥ ३ ॥ जगजन
नीसंतोषावें, मयुरारूढ होउनि यावें ॥ धृ ॥ अंबे
त्वां पावावें, गे अशीर्वचन तें द्यावें ॥ १ ॥ ७

" हे जगदंबिके " आदिमाये श्रीगणपतीचे

" आहेबद्दल आपली प्रार्थना केली, प्रसन्नहोऊन"
" दासावर कृपादृष्टी करावी, आणिकृष्ण लीला नामें,"
" जेंनाटक अह्मी करणें योजिलें आहे, ते निर्विघ्नप
" णें सिद्धीस न्यावें. व. नाटक पात्रांस बुद्धी देऊन,
" त्यांची भाषणें सर्व मान्य होत असें करावें, ए
" वढी प्रार्थना आहे.

वरील अर्थ सूत्रधारानें बोलून खालींलि
हिलेलें पद ह्मणावें व या वेळेस सरस्वती.
ने बाहेर नाचतयावें.

अष्टपदी

( प्रियेचारुशीले )

त्वरें धांवजगदंबिके आदिमाते, तूं अशीर्वच
नं दे देविमातें, कार्यसिद्धीकरी, वरदकारिके
श्वरी सकलजनतवरूपें सतत स्मरिते, त्वरें
॥१॥ नमन प्रकारानें तर तीचा
आज्ञेनें सूत्रधार भाषण.

" हे त्रिभुवनजननी दामोदरकवीनें आपल्या
" भरंवशावर नाटक रचना केलीआहे ह्मणून स
" वांची इच्छा पूर्णव्हावी असावर द्यावा व गणप

"तीआज्ञेनें मातुश्री आपली आराधना केली
"क्षमा असावी.

## देवी

### भाषण

" दासा,भक्तसंकट निवारण्या साठीं आह्मीं दे
" वतानीं अवतार धारण केलाआहे,-तेव्हा जीगोष्ट
" आह्मांस सहजीक, त्याविषयींची काळजी आ
" मचा भक्तानीं कशास बाळगावी, आतां तुझें
" इच्छे प्रमाणें तुझा नाटकांस, वनाटक पात्रांस-
"आशिर्वाद देत्येंश्रवण कर

### कर्नाटकचालीवर

ममकृदयेनें, नाटकतुमचेंहोमान्य, व्हावें
तुह्मिंदासानोवदत्येंजनांतधन्य ॥१॥

### भाषण.

" भक्तानों, तुमचेंनाटक सर्व मान्य होऊन,"
" तुम्हास यशमिळेल, हामाझा मनापासून पू"
" र्ण आशिर्वाद आहे, हे दासा, आणखी ही मा
" झे मनोगत मी तुम्हास प्रदर्शित करित्यें हेंऐकावें

### कर्णाटकीचालीचेंपद

ठाणे

नमनमी करिनमि गौरितनया, करिकींबा लावर सुदयानम ॥ धृ ॥ आज्ञाघेउनी ॥ ताल ॥ आज्ञाघेउनी, श्रीगणपतिची, आल्येंस्थाना या नमन ॥ १ ॥ भाषणऐकुनि ॥ ताल ॥ भाषणऐकुनितवबालांचें, तोषतोगुरुहृदया, नमन ॥ २ ॥ दामोदरकवि ॥ ताल ॥ दामोदरकविरसनामम रूपेंमान्यहो ऐकाया, नमनकींकरिन ॥ ३ ॥

भाषण

" हेदासा, मीश्रीगणपती-चरणास प्रणिपात
"करून तुला आशिर्वाद देत्यें, कीं, तुझी कार्यसि
"द्धी तुझ्या इच्छे प्रमाणें होवो, आणखी सांग
"त्यें ऐक. १

" भक्तराज, तुझ्या नाटक पात्रांचीं भाषणें ऐ
" कून बृहस्पतीचा मनांत ही आल्हाद होयील.
" मग इतरांची कथा काय! आणखी ऐक." २

" नाटकाचार्यो! तुमचा नाटकाचा उपन्न"
" कर्ता दामोदरनामा कविजो. त्याचा जिव्हा
"ग्रीं माझी निरंतर वस्ती आहे, त्याचे हस्तेंज
"नहेतूही परि पूर्णतेस पावतील, भक्ताआ

"तां मी आपल्या स्थळास जातें तुह्मीं आपल्या
" कार्यास आरंभ करावा."

विदूषक

" महाराज! सूत्रधारे, याकृत्यांत तुमचा"
" घात आहे, यइछिलेला हेतू परिपूर्ण होईल"
" असें अनुमान दिसत नाहीं, कारण, कीं जीबा
"यी मोराकृत्या आज दामोदर कविचा जिव्हा
"ग्रीं बसली. तीउद्यां तुमचा आमचा गळ्यावर
" बसेल. मगकाय त्या नाटकांत धूळ घालिता?"
" चला तुह्मी,

सूत्रधार

"अरे नटा तूं अशीजर विनोदाचींच भाषणें
" केलीस, तर पुढें नाटकसिद्धी कोणत्या प्र
"कारानें होईल, अरे ती सरस्वती मानुश्री दा
" मोदर कविचा जिव्हाग्री प्रसाद रूपानें बसली
" आहे' अस्त, आतां आपल्यास नाटकारंभको
" णत्याप्रकारानें करणें. तें मी तुला सांगतो: श्र
" वण कर."

# आख्यानारंभ
## ( दिंड्या )

जनमनरंजन करणें असे जाला ॥ करणें कीं
जनप्रीति विचाराला ॥ तरी जन तें मानिती कीं
तयाला ॥ ३ ॥ सर्वरस जरि जनमान्य नाटका
शीं हो, विभूषित तरि होहरि तिचीं त्याशीं ॥ धृ ॥
सहज होये तों चित्तरंजनाशीं, विभूष० ॥ १ ॥

## सूत्रधार
### भाषण

" नटा, जास नाटकादि कल्यानें जनाचेम
" न रंजन करणें असेल, त्याणें जनाची अभि रुची
" कोणत्या प्रकरणावर आहेती कळल्यावर त्या
" प्रमाणें कृतीकरावी. ह्मणजे सर्वांचा संतोष ह्मा
" ल्याशिवाय राहणार नाहीं, सांप्रत मला असें
" भासतें कीं. गीत, हास्य, शृंगार, करुणा, इ
" त्यादि, सर्वरस विभूषित जी कविता अ
" गर नाटक असेल त्यावर जनभक्ती असते,
" ह्मणून तीच योजना मी सांप्रत चा आख्यानां
" त केली आहे;

### गीती

कृष्णाचरित्रांतिलजे, विषयअसातिजनरुची सर्कीं मान्य॥जाणुनिकथनमिकरितों, नाटकरीत्याजनाशिंप्राधान्य॥१॥

### ओवी

महाबलभट्टविटंबन॥दुजापूतनाप्राणशोषण॥तिसराभागनौकाक्रीडण॥ चौथाराधाविलासतो॥१॥ उत्तमकवितांप्रकारें निरूपण॥ नाटकरीत्याआतांकरीन॥ करितांजाचेनित्यपठण ॥ पातकेसर्वहीदग्ध होती॥२॥

### सूत्रधार

### भाषण

"विदूषका, कृष्ण लीलेंतील" महाबलभ"
"ट विटंबन," पूतना प्राणशोषण," नौकाक्रीडन, व,
"चौथाराधाविलास, हे चार भाग कीं. जांत सुरस
"यथा काल कविता असून श्रीकृष्णाचे अ-
"त्यद्भुत खेळ दाखविले जावे असे, नाटक रीती
"नें करून दाखविण्याचा म्या निश्चय केला-

"आहे सन्मानादिक विचार तंत्र मात्र. तो सांभाळा
" वेंस;"

कथाभाग

प्रवेश १ ला

मथुरानगर

कंससभास्थान

अवश्यअसणारीनाटकपात्रे,

कंस १ चाणूर २ मुष्टिक ३ प्रलंब

सेनापती ४ चोपदार ५

कंसभाषण

(नकोहरीनिशिंबाहेर)

पूर्णपणेंयशसूर्यविकाशितगमतें मज माझा
झाला, सर्वअवनिचाप्र भु मी असुनी मा
न्य अखिल सुर श्रेष्ठाला. ॥ धृ ॥

दशरथसुत अवतारी थारानवता कीं त्या
असुराला, सर्वलयापावतूनिश्रीरामतोकीं
र्ती मान किं झाला पूर्ण पणें ॥ १ ॥

असुरकुळें दीनकीं होतीं, गवनसे रहा-
ण्याऽनला, सर्वांवाटलें सर्वहि असुरांचानाश

अतां झाला पूर्णपणें यश ॥१॥

भाषण.

" हे मुष्टिका! रामअवतारीं श्रीराम आम"
"चीं राक्षस कुळें निवटुन त्रैलोक्यांत कीर्ति"
"मान झाला, व, त्याचसमयीं, इतकी गोष्ट झा"
"लीकीं, जे शेष राक्षस त्यांचा असा कोणी"
"कैवारी राहिला नाहींकीं, त्यांस उदयास"
"आणील, आणखी ऐक."
"चाणूरा! मी तुला खरेंच सांगतों कीं ज्या"
"वेळीं अशी गोष्ट होऊन, दैत्य राहाण्यास ठिका"
"ण नाहीं म्हणून दशदिशा पळूं लागले त्या"
"वेळेस, मला असें वाटलें कीं, आतां हीं कुळें"
"कधींउदयास येत नाहींत परंतु आज कांहीं"
"प्रभूनें आपली सत्ता अशी विलक्षण दा"
"खविली आहे कीं, पृथ्वींत मजसारिखा को"
"णीच बलाढ्य नाहीं

गीती

थरथर दिग्गज कांपति, पाहुनि शौर्या
शीं आमुच्या रणींत॥ त्यायोगें स्वामीला

गणितीसकरनरसुभटमुकुटमणिते ॥१॥

भाषण.

"महाराज! इतर मानवांची तर स्वामी"
"पुढें कांहींच गणती नाहीं, परंतु काळही"
"आपणा पुढें उभा रहाण्यास असमर्थआ"
"हे; म्हणून स्वामीस देवादिक जे आहेत"
"तें सर्व सकलवीर श्रेष्ठांतील मुकुट मणि"
"असें मानितात.

चोपदार.

"महाराज भेटीस सिन्ह व्हावें सेनापती
"ची स्वारी मोठ्या उत्साहानें राजवाड्यास
"येत आहेत

सेनापती येऊन कांहीं आनंदाचीं
भाषणें होऊन कसानें विलंब लाग
ण्याचें कारण विचारल्यानंतर.

पद.

(साधननामाचे)

श्रवणाकरा विनतीस्वामीश्रवणाकरा
॥ध्रु॥ धन्यभाग्यमाझेंतेंझालेंपाहिलिमुनिमू

तीस्वा ॥१॥ आज्ञाजालीनिवेदितोंमीदी नसेवकापतीस्वा ॥२॥ वधूवरेंमिरवां वींतुम्हींकराक्षितीवरिकीतीस्वा ॥३॥

भाषण.

"महाराज! आजमाझें धन्य प्रारब्ध कीं, स्वामिकार्य सिद्ध करून आनंदानें येत अ सतां नारद स्वामींचें दर्शन मला झालें, आण "खी ऐकावें.

"त्रैलोक्यनाथ. नारद स्वामीनीं आपणा "स एक आज्ञा केली आहे, ऐकून घ्यावी.

"पृथ्वीनाथ! स्वामीचा भगिनीचा वि "वाह जो वक्र देवाशीं झाला, तो पृथ्वीमध्यें "वर्णनीय खरा परंतु आपण आपल्या भ "गिनीचा विवाह कार्यांत स्वांगें विशेष प्रीती "नें परिश्रम केला नाहीं, या स्तव सांप्रत का "ळींजी वरात काढणें आहे ती अशी का "ढावी आण त्यारथावर वधूवरास बसवू "न, स्वहस्तें वाग्दोरे धरावे म्हणजे सर्व "त्यांस संतोष होयील.

# कंस

## श्लोक.

आवेसत्वरिसिद्धतातिकमणें सोडोनि
यां कार्यातें वेगें आणाविंतो इहंवर अतां
तुम्हीच कीं आर्यतें ॥ आज्ञापानिदला
शिसिद्ध करणे येतो अतां सत्वरी आज्ञा
सिद्ध करीन मी सुचिंचिती संतोषुनी अं
तरीं ॥१॥

## भाषण.

" सेनापती! आपण मुख्यत्वें जाऊन"
माझा स्वतःचा रथ सिद्ध करवावा वचातु"
रंगसेनेची तयारी ठेवावी, आणि सर्वसउत्तमप्र
कारचीं वस्त्रें भूषणें परिधान करण्याची आ
ज्ञा करून सर्वांसह वधुवरांस सिद्ध ठेवावीं
इतक्यांत मी येऊन स्वामीच्या आज्ञेस उत्त
म प्रकारें भूषणालंकृत करितों, चलाले
कर "

सेनापती गेल्यावर कंसानें त्याचानि
मित्तानें सभाविसर्जन करावी.

## प्रवेश २रा

### स्थळसत्यलोक.

अवश्यअसणारींनाटकपात्रें.

१ ब्रह्मदेव २ विप्र ३ स्त्रीरूपीपृथ्वी
४ देवमंडळी.

प्रथम ब्रह्मदेव पुढें आल्यानंतर एकामागून एकानेयावें.वंदनमन वगैरेहोऊन कांहीं दुःखसूचकभाषणे झाल्यानंतर.

ब्रह्मदेव

गीती.

सुरवरखिन्नकशास्तव, कांपृथ्वीदीन होउनीबसली ॥ विपरितवार्तामजला काहिंअसेमजशिंअंतरीठसली ॥१॥

भाषण.

"सकलदेवहो! एवढा काय तुम्हांवर आ
"णि,या विप्रांवर कहर गुजरला आहे कीं,
"तुम्हीं म्लान मुख होत्सातें सत्यलोकास
"आगमन केलें,अहोपृथ्वीबायी!तुम्हांस बरेंको

यातें संकट? कायत्याच कंसा सुरानें तुमचा
"पृथ्वी वर अनर्थ मांडला? किंवा झालेंतरी
"काय. निवेदन करावें.

पृथ्वीनें सर्व ब्राह्मणच सांगतील
असें म्हटल्यावर.

विप्र

ओवी.

राक्षसकुळें होउनि उन्मत्त ॥ देवस्थानें
केलींउध्वस्त ॥ म्हणुनिसर्वहोउनी चिंता
ग्रस्त ॥ चरणदर्शनापातले ॥१॥ जरीन
केलाकांहीउपाय

भाषण.

"ब्रह्मदेवस्वामी! निशाचरांचा भार दु
"सह होऊन, पृथ्वी आपणास शरण आ
"ली, देवांसही सबल त्रास झाल्यामुळें ते
"ही आले, व, अशा ब्राह्मणादिकांचीं यज्ञ
यागादिक कर्में कांहींच चालत नाहींत म्ह
णून अह्मी सर्वच आपणास शरण आ

" लों आहों, जर आपण संकट निवारणार्थ
" कांहींच उपाय नयोजिला, तर मोठी कठी
" ण वेळ आहे.

सर्वांचीं भाषणें ऐकून क्षीरसागरीं
जाऊन परमेश्वर प्रार्थना करणें त्याचें
ठरवावें, व सर्वांनीं आंत जावें.

## प्रवेश ३ रा.

अवश्य असणारीं नाटकपा॰
देव १ ब्राह्मण २ पृथ्वी ३ ब्रह्मदेव
४ श्रीविष्णू ५ लक्ष्मी ६
सर्व तीरीं जाऊन ब्रह्मदेवास प्रा॰
(व्यर्थ या जन्मासि आ)

व्यर्थ या जन्मासि आलों ऐसें वाटेंस कळां
शीं, स्वामी सर्वही मिळुनी आलों सचिं
त अपुल्या चरणाशीं व्यर्थ ॥ ध्रु ॥
आश्रय द्यावा जोडुनि आता, दूर क
रावीं संकट वार्ता, तुजविण असें ही सत्ता
नाहे त्राता तुजविण अह्मांशीं व्य ॥ १ ॥

दामोदरप्रभुलागीं विनती, करुनियांकि अमुचीं तिविपत्ती, तुजवांचुनि अनुपपत्ती सांगुनि फळ तें नोहे इतरांशी व्यर्थ याज न्मा शि॥ २॥

भाषण.

"अहो ब्रह्मदेवस्वामी! आमुचें संक"
"ट आपणा वांचून दूर करण्याची दुसऱ्याची"
"शक्ती नाहीं, असें अम्हीं संपूर्ण पणें जा"
"णून आपले चरण धरिले आहेत, अं"
"म्हांवर कृपाळू होऊन, हें कार्य करावें का"
"रण उपकार होतील. १

"अहो स्वामिराज! आमुची विपत्ती"
"आपणाच श्रीमज्जगन्निवासास कळवून"
"यासंकटास त्यांचा आश्रय घ्यावा, आमचें"
"दुरव कळविण्यास अम्हांस आपणा शि"
"वाय दुसरें कोणवरें आहे.

ब्रह्मदेव सर्वांस आश्वासन देतो. आणि क्षीराब्धिवासाची प्रार्थना करि

दिंड्या.

अवनिवरीलोहाहाःकारझाला, हरिलें दुष्टतंदेवस्थानाला, दूरकरिबापासर्व संकटाला, ॥ ३ ॥ कृपानीधानादेवदुः- खिहोतीरतुजलागीयेऊनिप्रार्थीती ॥ धृ ॥ होयत्यांशीतीसर्वसौख्यप्राप्तीहो, ऐसेक रिदेवामान्यरमापती ॥ १ ॥ अवनिहोअनि यांसर्वस्वीदीन, तेसेऋषमुनितेइतर ब्रा ह्मण, येतिमजसंगेअवलंबुनिस्थान, - याविंसर्वांशीअर्पणप्राणदान ॥ ३ ॥ कृ पाकरुनीयानिवेदाविपूर्त्तीहो, ऐसेकरि देवामान्यरमापती ॥ धृ ॥ होयत्यांशीतीस र्वसौख्यप्राप्तीहो ऐ ॥ २ ॥

भाषण.

"हे लक्ष्मीपते! हेक्षीराब्धिशयना! हेवै" "कुंठपते! सर्वऋषि, गंधर्व, विप्र यांस महत्सं" "कट पडून आपणासच दुखमोचक असें जा" "णून येथें आले आहेत, त्यांचे दुखमोचन आ" "पले हातून व्हावें, व त्यांस अंगीकरावें, ही मा" "झी विनंती आहे. १

"हे त्रैलोक्यनाथा! दुष्ट दैत्यभार परम"
"दुःसह होतांना, पृथ्वी दीनवाणी होऊन मज"
"संगातें येथें आली आहे. आणि, देव, विप्र हे स"
"र्व स्थानभ्रष्ट झाल्या योगानें, म्लानमुख हो"
"ऊन, आपलें स्तवन करीत आहेत. त्यां सर्वां"
"ची विपत्ती दूर होयी अशी कांहींतरी आ"
"पण युक्ती योजून आज्ञा करावी; व, आप"
"ण त्यासर्वांस प्राणदान देऊन यश घ्यावें ही"
"च प्रार्थना आहे. २"

कांहींच उत्तर मिळत नाही म्हणून सर्व एकमतानें भजन करितात. तें ऐकून मध्येंच ध्वनी येतो, तो आल्याव र ब्रह्मदेव सर्वांस इशारत करितो, व. ह्मणतो

(रूपसाध्याप्राधिंशि)

एका एकाग्रस्वस्थ चित्ततें करूनियां आज्ञा वचन, ध्यानें जाहली संकटहरण्यास्तव, मानावा नीश्चयपूर्ण, जाणावें तुमचें तें दुःखकीं जाहलें हा सर्वहि दहन. ॥ चाल ॥

आतांसकंआपणकींभुलण, करूंसतवि
तीपाळींग्रहण, ऐकावेंहेंमाझेंवचन ॥३॥
अरिनिर्दळनतेंहोउनिपाहोंमकरवीसदांदी
नतिंअवनी, तुम्हांअसाशींस्थानेंमिळती
घेतलींमींदुष्टेंहिरुनी ॥४॥

भाषण-

"हे सकल देवहो! आपण नामस्मरणांत"
"निमग्न असतां अकस्मात् क्षीर सागरांतून"
"ध्वनी उमटली आहे, त्यावरून मला असेंवा"
"टतें कीं, आपलें संकट निवारण होण्या प्रीत्य"
र्थ कांहींतरी श्रीमज्जगदीश्वराची आज्ञा हो"
त आहे, ती आपण ऐकून त्याप्रमाणें वर्तणू"
क करूंया.

ब्रह्मदेवाचे आज्ञेप्रमाणे इत्यर्थ ठरू
न सर्व स्तब्ध रहातात इतक्यांत देवा
चें वचन-

(चाल ब्रिजमें होरी खेले)

माझेंमनतें धालें, आतां अभय मि दिधलें, माझेंमन ॥ ध्रु ॥ स्वस्थ असावें तुह्मी मान

सिंइच्छितनतुमचेंजालें आतां अभया ॥ ॥१॥ आज्ञा एकादेती माझी, कथितो मी यावेळें आतां ॥२॥ ह्मा मोदर प्रभु माध्य तु झ्मारी, जाणा सर्व त्रिकालें आतां ॥३॥

भाषण.

" हे सर्वदेव, विप्र, ऋषीजनहो। तुमची "
" स्तुती ऐकून माझें मन संतोषित झालें, आ "
" णि तुमची विपत्ती निवारणार्थ मी जी "
" आज्ञा करितों ती एकचित्तें श्रवण करावी "
" ह्मणजे तुमचें दुःख निश्चयें नष्ट झालें अ
सें समजावें

ओवी

यादववंशी मी अवतरेन ॥ सर्वांशीं सखदे यीन ॥ असुरांचा दर्प झाडीन ॥ सुखी करी न अवनीशी ॥१॥ बालक्रीडा करणें मनांत ॥ तुह्मी पुरवावा तो चि हेत ॥ गोवर्दी होऊनि विख्यात ॥ ख्याती करून जगत्रयीं ॥२॥

भाषण.

" हे सकल भक्तहो। मी मथुरेस देवकीचा

"पोटीं अवतार धारण करीन व तुह्मी देव,"
"देवता, यांणीं गोप व गोपी अवतार धरावे"
"व, शेषानें रामावतारीं कनिष्ट बंधू होऊन मज"
"सवें फार कष्ट सहन केले, ह्मणून त्यांणें या"
"समयीं श्रेष्टबंधुत्व स्वीकारावें, आणि जन्म"
"तांच मी गोकुळांत येयीन, आणि बहुतेक"
"शत्रू मी मनरंजक खेळांतच मारीन, नंतरप्र"
"संगीं मथुरेस जाऊन, सर्व देवांचे संकट"
"हरण करीन, तुह्मीं स्वस्थानाप्रत गमन"
"करून सांगितलेलें कार्य करावें, ही माझी"
"तुह्मास आज्ञा आहे. मी आतांपासूनच कं"
"सांतः करणांत भ्रम उत्पन्न करितों,

सर्वजातात,

## प्रवेश ४ था.

### स्थळ मथुरा

अवश्य असणारीं नाटकपात्रें

कंसासुर १ प्रधान २ सेनापती ३
चोपदार ४ वरातसमारंभ ५ व

सुदेव ६ देवकी ७
कंसासुर सभेंत बसला आहे. व सभे
वीरचना पाहून

(सांजणी वेडिझालेंकार)

धन्य मी धन्य अवनी हो, मानिती सुरवर की
मला, धन्य ॥धृ॥ बाहूबळ तें तुमचें असे मज,
काळ तो मनिं गजबजला सा ॥१॥ प्रताप तो
रोकुनी, सुरवर मानसीं, हिमज्वर तो संचरला
सा ॥२॥

भाषण.

"हे वीरहो! तुमचा बाहुबलयोगानें"
"मी त्रिजगामध्यें धन्य म्हणवितो. व, माझा प्र"
"ताप पाहून, सर्व सुरवरांस अंगांत हिमज्वर"
"संचार होतो, व, काळही घाबरतो, सारांश, सर्व"
"तुमचा प्रताप.

चाणूर.

(पुन्नागवभाषण)

त्रिजगपालका प्रभो त्रि. संकटभारवाह
का. सुरसमुदायनाशका प्रभो ॥ धृ॥ म

यकतें अह्मीं स्वामि शौर्यापुढें, कलिकाला सि अंतका, प्रभो ॥१॥ हृदयतें फाडें रोकु नि कीर्ती, प्रियजनश्रमहारका, प्रभो ॥२॥

भाषण.

"हे पृथ्वीनाथ! आपली कीर्ती, शौर्य, ऐकून"
"करवरा सारिखे गर्भगळित होऊन, कालासा"
"रिखे ही थरथरां कांपतात, तेथें आमचा बा"
"हूबळ साह्याचें वर्णन करणें किमर्थ, तथापि य"
"जनास मात्र आपण अत्यंत आनंदकारक, ह्मणून"
"पाहिजेतें भाषण शोभेल.

हें भाषण होत आहे तों, सेवकानें, वरा तीची तयारी झाल्याची वर्दी दिल्या नंतर, कंसजातो, इतक्यांत, वरातसमा रंभ पुढें तयार असतो, त्यांत हा मिळू न पुढें चालतात.

वसुदेवभाषण

श्लोक.

बा रे धन्य खुझी ति भक्तिसह सादर खेन कोणा असी; भावा बायोग्य सुशील तूंचि दिसशी सर्वा

गुणीमान्यसा ॥ माझेंचित्तकयोग्यरम्यगु णिंतगुंतेसखेरेशालका, कीतोंधन्यतिविस्तृ ता बहुतुझी,लोकेंजगत्पालका ॥१॥

भाषण-

"हे शालका! असाभगिनी भक्त, करीतात"
"मानू मी कुठेंच पाहिला नाहीं, एक तूंच आहेस;"
"फारतर कायसांगूं, परंतु, माझें मन सर्व तुझ्या"
"मान्य गुणांतःकरणाकडे केवळ गुंतून पडलें आ"
"हे. शाबास!

पुढें वरातजात आहे, इतक्यांत, भयं कर आवाज येतो,व, सर्व घाबरल्या- सारखे होतात तो

गीति

थरथरदिग्गजकांपति, शेशानभवाणिक र्णितीफ्झाली ॥ अस्याकरितीसावध,मरण शिमाजवळिकीतुझीआली ॥१॥ अष्टम गर्भतुझाअरि, जाणनिश्चयअसाचितूंअ सुरा ॥ राक्षसकुळिंभीतीती, विचरेतेंसासु योग्यतोअसुरा ॥२॥

नभवाणीतील
भाषण

"हे असुरश्रेष्ठा, इतके दिवस तुझें ऐश्वर्य"
"अविछिन्न होते, परंतु, आतां तुझी आयुष्यशि"
"मा भरली ह्मणून तुला सावध करितों कीं तु"
"ह्मा भगिनीचा पोटीं जो आठवा पुत्र होयील, तो"
"तुझा प्राणाचा ग्राहक, असें त्वां निश्चयें सम"
"जावेस, हे वचन काळत्रयी खोटें होणार"
"नाही आजपासून निश्चय जाण कीं असुरश्र"
"ष्ठीं भीती. वइतरांतःकरणांत संतोषानें प्रवेश"
"केला.

हें वचन ऐकतांच कंस दचकून क्रोधा
यतो; आणि हातात शस्त्र घेऊन भगि-
नीस मारावयास धांवतो; यावेळे सना
टक चालीप्रमाणे ताल बंदी श्लोकाची
धादल असावी आणि शस्त्र मानवर-
ठवितोतो.

देवकी.
(धनद्रव्यालानाहिंनि)

निवारकरिमगिंबंधोपाहे, दीनदीनतवभगि
नी, दयाउपजुंदेमाझीयासमयींमृदुअंतःक
रणीं।। अपराधीनव्हेकींपाहेसदयाआणि
कि ध्यानीं, मगताबंधोविनविते मीतुजला
कींदिनवाणी ।।१।।

भाषण.

" अरे बांधवा, मी याव ज्जन्मांत तुला असा "
" कठोरांतःकरणी पाहिला नसतां आजच "
" मज निरापराध्यावर रुष्मन होसाना व "
" ध करण्यास प्रवृत्त कांबरें झालास. अरे "
" बांधवा दीन भगिनीस तुजवांचून रक्षक को "
" ण बरें आहे."

(अंतांकिलिकरूतरिम)

कितितरिविनवुंमितुजला, बांधवा, वंदन
तुझियापदकमलाला, बांधवाकि ।। धृ।। वं
दनकरुअम्हिंतवआज्ञेशीं, घ्यावे तववच
नाला, बांधवाकि ।।२।। स्त्रीहत्येचादोषकि
तीतरिविचारीलुस्वमनाला बांधवाकि
।।२।।

भाषण.

"हे दीनदयाळा! असा वज्रहृदयी तूं कठो"
"र कां झालास! अह्मीं उभयतां तुझा आ"
"ज्ञेंत जन्मवर वागण्यास सिद्ध आहों. देवाक"
"डे ध्यान देऊन आह्मा उभयांचें याक्षणीं रक्ष"
"घा कर"

वसुदेवभाषण.

"हे दीनदयाळा! बाळका! निरर्थक भ"
"गिनीचा वध तूं दुष्टबुद्धीस प्रवृत्त होऊन"
"कां बरें करितोस, कंसासुरा! स्त्रीहत्येचा दो"
"ष फार आहे, ह्मणून तुवां भगिनीस प्राण"
"दान द्यावेंस, अशी माझी प्रार्थना आहे.

कंसासुरभाषण.

"अरेचांडाळांनो! तुमच्यामुळें मलाम
"रणाची भीति, त्या म्या तुह्मास प्राणदान दे
"ऊन काय आपल्याच पायावर कुऱ्हाड मारू
"न घ्यावी, त्यापेक्षां जर मी भगिनीला मारू
"न टाकिली तर मी निर्भय होईन.

इतकें बोलत आहेत, तों नारद येतात.

पद.

(नारायणविधिना)

कलहप्रिय कलहांतश्रेष्ट तोकलहाशीं कीसा
स्य, नसे कुठें कलह तो,जरी नारि होये कीं निरु
पाय. नारायण ॥१॥

नारद त्वरेनें येऊन कंसास वारून म्हण
तो. –

(कांमजलाछलिला)

सोडितुं भ्रांतिमनाची, असुरश्रेष्ठा रे,सो. ॥ध्रु॥
त्रिजगीं श्रेष्ठतूं असुरनी राजा, कां भीती तुजया
ची. अस. ॥१॥ भाकित विश्वास किं धरूनी
तो न करी हानि जिवाची अस. र ॥२॥ काय
अपाय तो,तुजला होये. भीती काय कुणाची,
अस. ॥३॥

भाषण.

"अगे कंसासुरा! व्यर्थ नभवाणीवर वि
"श्वास ठेवून तूं स्व भगिनीचा घात करण्यास
"प्रवृत्त का बरें झालास; जो तूं त्रिजगांत बला
"ढ्य असुरांचा राजा त्या तुला नभवाणी पासून का

"य पीडा होणार आहे. तुला पाहिजे तर त्या
"स मति बंधात देव, परंतु माझें रोकशील त
"र, भगिनीची प्राणहानी करूं नको.

कंस

(बहुतादिवशीमजद)

स्वामीजालाअतीत्रासऐकुनियांनभवृचन
सांगतोंसत्यस्मरुनिचरण, भगिनीस्न हा
साठींमनतेंतोषिकरुनिपूर्ण, निघालोउत्सा
हेंकरुन॥ प्रथमग्यासिंमक्षिकापाततेसीती
गतिजाण, जाहलीमनतेंउद्विग्न ॥चाल॥
व्यर्थवारितांमला "स्वामी" वधितोंभगि
नीगळा "स्वामी" निशिदिनीं खेदचित्ता
ला॥३॥ आज्ञा व्हावी दासामातितीइच्छि
तकरण्यामन, कृपाकरुनीस्थिरवावेंमन,
॥धृ॥ नारदस्वामीआज्ञाद्यावीवंदितोंमित
वचरण कृपाकरुनी स्थिरवावेंमन॥१॥

भाषण.

" अहोनारदस्वामी! आपल्या चरणा
"चीशपथ वाहून मी विनंती करितों, कीं मीआ

"दित होत्साता भगिनीसह शालक, वगैरे स
"मारंभांत उत्साहाने निघालों, आणि एका
"एकीं ही दुष्ट नभवाणी ऐकतांच जामसाचे
"प्रथम ग्रासामध्यें माशी पडते, तद्वत मला
"अपशकुन झाला, आणखी माझी विनंती
"ऐकावी. १

"स्वामिराज व्यर्थ मला वारून माझाघात
"करूंनका, मला इच्छित कार्य करून एक वेळ
"यश भरीत होऊं द्या, कारण कीं, भगिनीचा व
"ध केला ह्मणजे जन्माचा सुखी झालों.

## नारद.

### भाषण.

"कंसासुरा! जो तूं त्रिभुवनास अजिंक्य,
"तो तूं इचा पोटी पुत्र होयील, व त्याचा हातून
"आपण मारले जाऊं, अशा कृत्यास भितोस,
"चल आपला क्रोध आवर आणि याउभयां
"स बंदीशाळेमध्ये रक्षण करून, यांस जो पुत्र
"होयील, तो तूं घेऊन मारीत जा, ह्मणजे स
"र्व विपत्ती चुकली.

हीगोष्टकंसाचेध्यानींठसून-

कंस

भाषण-

"अरे चांडाळा बाळका! नारदस्वामीचा
"आज्ञेनें तुह्मां उभयांचे प्राण रक्षण करितों
"परंतु जर तुह्मांस पुत्र होतील ते मला देण्या
"चा करार कराल तर ही गोष्ट घडेल,बोलका
"य मनांत असेलतें नाहींतर हें झळझळतें"
"खड्ग पहा-

हे ऐकून देवकी

(अयिमयमांसदे)

बंधोपरिसेममवचना॥धृ॥ मागितलेंमी
तोषेंदेयिन,रक्षीतूंप्राणा"बंधो"॥१॥ प्रा
णापरतेंकाहींनसेअह्मा,जरिकरिशीकरु
णा,बंधो॥२॥दामोदरप्रभुतुष्टतुझावरि
फिरवीतूंस्वमना बंधो॥३॥

भाषण-

"हे बंधुराज! आपण जर आमचे प्राण
रक्षण यामागण्यावर करील असलां तर ही-

गोष्ट अह्मांस कबुल आहे, आणि, हें अह्मीउ भयतांही वचन देतोंचे, (देतात) कीं जो अह्मां "सपुत्र होयील तो अह्मीं मोहपाशांत नगुंतता तुजला अर्पण करीत जाऊं.

कंस.

"फार चांगलें, भगिनी! आतां आपण प तिराजासहवर्तमान सुखी असावे कोण आ हेरे तेथे?

चाणूर.

"महाराज काय आज्ञा असेल ती करावी सेवक ती प्रतिपालन करण्यास सिद्ध आ हे.

कंसासुर.

"या उभयांस पाक्षणीं बंदीशाळेंत नेऊन ठेव, आणि वज्रदंष्ट्री नामे दैत्याचास्वा धीन तीनसहस्र दैत्य देऊन, त्यास बंदिशा ळेचा रक्षणाचें काम सांगावें, नारद मुनि आपणास फार श्रम झाले. क्षमा असावी (नारद गेल्यानंतर सर्व जातात)

प्रवेश ४ था.
स्थल, बंदिशाळा.
अवश्य असणारीं नाटकपात्रें.
कंसासुर १ वसुदेव २ देवकी ३ कंन्या ४
श्रीकृष्ण ५ आकाशवाणी ६
कंसासुर.
(तुझिझुरे बाबरे)

वज्रदंष्ट्री आतां म्याकायकरावें, अष्टम गर्भापासु निकेविंवांचावें॥ करणेकायतें मजमतिसुचांक थावें, नातरि विषखाउनि यांवारेमरावें॥ कोण्या गर्भाप्रती अपणमारावें, जेणेंकरूनी निर्भयअ पणअसावें.

भाषण.

"अरे वज्रदंष्ट्री माझे चित्तास तळमळ"
"लागून रात्रंदिवस स्वप्नांत, जागृतींत, ध्यानीं, मनीं,"
"शयनीं आठवा दिसत आहे. आतां यापासून वा"
"चण्यांसयुक्ती कायकरावी. ?

वज्रदंष्ट्री
भाषण.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

"महाराज! आपण एवढ्या संकटांत पड
"लांका? आपण काळाचे काळ असून आपणा
"स एवढी भीती कुठून आली? जो आठव्यापासू
"न आपल्यास भय तो जन्मास आल्यावर अंह्मीं
"आपले स्वाधीन करितों

हें ठरत आहे तो नारद ऋषी येतात, व, न
मनाशिर्वादानंतर. — नारद.

भाषण

"अरे कंसासुरा, प्रथमपासून जर मोजित"
"गेलें, तर पुढील आठवा, आणि, पुढून मागें आलें"
"तर प्रथम गर्भ आठवा होतो, आणि, तुला तर"
"आठव्या गर्भाचें भय आहे, ह्मणून मला असें वा
"टतें कीं, एकंदर गर्भ मारून निर्भय व्हावेंस ह्म
"णजे तुझें कार्य झालें.

सूत्रधार.

गीति.

युक्तीमानुनि यनिंती, गर्भ सहा मारिले तदा
असुरे॥ पातकसंचय महाला, रडतिप्रजा सा
दंकाळवीर्यं सुरे॥१॥ सप्तमगर्भाजिराला, रो

हिणिउदरांत योगमायेनें।नेउनिठेविला ते
"व्हां, बालकजैसाचिनोस्वमायेनें॥२॥

भाषण.

सकलजन हो! नारदस्वामींनीं सांगीतलें हीं,
कल्पना कंसाचा मनांत ठसून, "गर्भ मारले"
" आणि सातवा गर्भ देवाचा आज्ञेनें योगमायेनें"
"रोहिणीचा उदरांत नेऊन ठेविला, तो गर्भ जिराला
"असें कंसास वाटून, स्वस्थमानस होत्साता तोच
"क्रम चालविता झाला. इकडे देवकीच्या अष्टम ग
"र्भास नवमास पूर्ण झाले एक्यावेळीं देवकी भ्र
"मित होऊन व सुदेवास बोलले.

देवकी.

(तुह्मिझुरे बावरेपं.)

प्राणनाथमनसंतोषित कीझाले, वाटे प्राक्तन स
कळांचेंचउदेलें॥ देवसंकटामनितेमुक्त किंझा
ला, दुष्टराक्षसांसवधीसं ह रिले, खेळखे
ळुनीगवळीजन सुखिकेले, गोपीशींसावाज्य
किंसुखतेंदिधलें॥

॥चाल॥ धनुर्यागमंगिलास्वयेंजाऊन॥कं

मासकरदुष्टाचाहरिलाप्राण।। मुष्टिकचाणूर तेमर्दिलेजाण।।३।। ऐसेममअंतरींखचितजाणि चलें,वाटे भक्तजनसकलांचेचउद्देले ।। धृ।। सक रतेंसर्वहीनष्टकीं झालें,वाटे ।।१।।

भाषण

प्राणनाथा जरी आपण या संकटांत केव्ह गुंतून पडलों आहों, तथापि, आज मला कांहीं चित्तांत असा विलक्षण आनंद झाला आहे कीं, तो वर्णण्यास यात्रिभुवनांतही स्थान दुर्लभ, मला असें वाटतें कीं, कंसासुराचा मी आतांच प्राण घेईन. सर्वदेव संकट मुक्तकरीन. सकल गोपगोपीजनास अतिसुख देईन, आणि, माझे पांडव जे परमभक्त त्यांस मी सुख देईन.

वसुदेव.

(जाचावंशीं कुलध)

प्राणसखये कांगे तूं असें वदसीगे, अपायींगेस र्वांरिंव्यर्थचिपडशीगे ।।१।। जरिकंसा कळला हा वृत्तांतगे, तरिहोयकींसख्येनिश्चयघातगे, ।।२।। जिरालातोसख्यावागर्भतूझागे, कंसदर्पे

आम्हांतोव्यथितकिंमाझागे॥३॥ बोलेनचितूं ऐशीगेनष्टवाणीगे. शास्त्रिआणीहे प्रियेअंतःकरणीगे॥४॥

भाषण.

अगेप्राणप्रिये, जा कंसाच्या धाकानें सातवा गर्भ जिरला, त्याचीच तूं निंदा करितेस, आणि जर ही वाणी रक्षकांचा कर्णी आली तर उभयांचा घात झाल्याशिवाय रहाणार नाहीं, ह्मणून माझी विनंती ऐक. आणि अशी बरळूं नको.

सूत्रधार.

गीती.

ऐकुनिअनुचितवाणी, रक्षकते धांवली कळवाया॥ कंसासुरासिं वृत्त हें, त्याचें मन समसन्नवळवाया॥१॥

भाषण.

"कृष्ण प्रकट होऊन याचाच आज्ञेंधन्वयें, त्यास"
"गोकुळांत नंदगृहीं ठेवून तेथील कन्यायेथें वसुदेवानें"
"ठेविली, व बोलत आहेत हें सेवकानें सांगतांच कंस येऊन कपयेथें"

कंसभाषण.

" अगे मनआल्हादकारके भगिनी, मी इतके
" दिवस तुझे गर्भ मारून टाकिले, परंतु त्याविषयीं
" त्वां, मुखावाटे अक्षरही काढिलें नाहींस, यासाठीं
" आतां तुझाशी शरण येऊन, या गोष्टीविषयींची क्षमा
" मागून सांप्रतचें बालक जें जन्मास आलें आहे.
" त्यावरच मी लोभ ठेवितो! इकडे दे.

## देवकी

(गुणग्राहिकराज)

बंधोभयवाटतेंमनींतें कन्या, घ्यायाशीं, लोभ
तुझाक्रोधयुक्तपाहुनिभ्रमलोचित्ताशीं॥ जरि
त्वांकेलाघातकिं ईच्याकायकरणेंतुजशीं॥ क्ष
माकरीयाक्षणिंतूंजावेंआत्तांस्वगृहाशीं॥१॥

भाषण

" बंधुराजा, तुझे कपट मोहरूपी मोहां
तःकरण पाहूनमाझ्या म नांत भीतीनें अधैर्यता
प्राप्त झाली आहे. याकरितां मी प्रार्थना करितें
कीं या समयीं त्वां अपुलें मन आवरून स्वगृहा
स जावेंस.

नानाप्रकारच्याकपटभाषणानीं तिचेंम

ठाणे.



नभ्रमित करून,तो गर्भ हातीं घेऊन करकरां दांत खाऊन.

( गोरारंग गोजिरा )

अरे घातक्या नष्टा दुष्टा तुझ्यामुळें मजशिं अपाय, होणें ह्मणुनी करितों तुझिया मरणाची प्रथ र्किं सोय॥ जगदीश्वर देवांशीं नव्हे मजशीं झाला तो सहाय, आतां निर्भय झाला निश्चय मूर्खा रे माझा काय ॥१॥

भाषण.

अरे चांडाळा तुझ्यापासूनच सर्व मला अपाय होणार ह्मणून याचवेळीं मी तुझा संव्हार करितों मग त्रिजगांत मला अपेश देणार दुसरा कोण आहे!

असी वचनें बोलून शिळेवर आपटण्यास आला,तों

देवकी.

( जयश्री मंगळमूर्तिम )

बंधो क्षमा करूनि मज ला,देणें द्यावें, माझें बालक आतां कीं सांभाळावें हो, किति तरि तुज लाते

बंधो म्या विनवावें ॥३॥ करि कृपा भगिनी वरी॰ पाहुनी दुरी॰ सदय अंतरीं॰ होउनि सोडावें, बंधो क्षण॰ ॥१॥

भाषण

"अरे बांधवा, माझा विनंती ची कांहींतरी"
"दया येऊन एवढ्यातरीं बालकांस सोड॰ अरे ही
"कंन्या आहे इचा हातून तुझें काय होणार॰

कंसभाषण॰

अगे दुष्टे तुला काय! होएकीकडे! माझा अभिगाची मलातर अस्था असली पाहिजे, ही कन्या असो, किंवा पुत्र असो, आपटल्या शिवाय टेवित नाहीं॰

शिळेवर आपटण्याकरितां हातवर करितो, तों तीनिसटून आकाशांत जाते, आणि बोलते

ओवी॰

अरे दयात्तुझा अरी॥ वाटतसे गोकुळांतरी
स्वचित मानी अंतरीं॥ काळतूझा तोचि असे॥१॥

" अरे घातक्या, तुझ्यासर्वांत मीच तुझा शत्रू असा
"वा असें असेल. परंतु. नसें नव्हे, तुझा शत्रू गोकुळा म
"ध्यें शुक्लपक्षींचा चंद्रासारीखा वृद्धिंगत होत आहे."

## कंसा भ्रमिल होऊन घरीं जावयास लागतो

(गझानों कुण्या गडी)

कंसासुर वेडा झाला चिंतानळें भ्रमित झाला ॥
अरिनामाचा ध्यास लागला, शोकानळ हृदयीं
झगटला ॥ ह्मणे काळें तो प्राण हरिला, मारा को
णि जाउनि हरिला ॥ ऊ ॥ सत्य जाहली न भवाणी
जाहली सर्वस्वी हानी ॥ धृ ॥ नाहि कुणि आला
अभिमानी, झाली सर्वस्वी हानी ॥

"अगा परमेश्वरा! माझा प्राणरक्षाचा, व निर्भय"
" पणें म्या राज्य करावें एतदर्थ बहुत यत्न केले. परंतु पर"
" मेश्वर अवकृपेनें सर्व उलट झालें, आतां मात्र माझा"
" जिवाचा निश्चयें घात होयील असें मला वाटलें व अ"
" शा संकटांतून मला यांचविण्यार कुणीच दिसत नाही."

## वज्रदंष्ट्री भाषण

"राजन्! आपण अशीं अस्थैर्यसूचक भाषणें"

" करीतां तेणें करून आह्मा सेवकांचें धैर्य जातें, आणि"
" अशी म्हणजे स्वामीस विनंती करावी असा अर्थ नाहीं"
" परंतु—

श्लोक

विपत्तिकाळीं न चि धैर्य सांडणें, संपत्तिकाळीं सुद
यान टाकणें॥ संताप काळीं धरणें चि शांती, सु
ज्ञाशि ऐशी कविची विनंती॥

" या श्लोकाचा अर्थ पाहूं जातां आपलें सर्व करणें"
" उलटें दिसतें, आणि, पराक्रम, धैर्य, उद्योग, विद्या"
" बळ कपट, हे सर्व गुण आपणा जवळ मूर्तिमंत उभे आ"
" हेत मग या आपणास एव्हढी अस्थैर्यता कायह्म"
" णून झाली आहे हें कांहींच समजत नाहीं.

इतक्यांत गोकुळांतून कंसदूत
यावे. त्यास विचारल्यानंतर.
त्याची विनंती.

" हे त्रैलोक्यनाथ! आह्मी गोकुळांत असतांस्व"
" नेत्रें करून जे वृत्त अवलोकन केलें आहे, तेणें करून"
" आह्मांस तर खेद झालाच आहे, परंतु, त्यांतील एक शब्द"
" द्दही स्वामीपुढें उच्चारण्यास रोमांच उभे राहतात"
" परंतु जाली गोष्ट स्वामीस निवेदन करणें हा सेवक ध"

"ऐसणून निवेदन करिलों ऐकावें.

(बहुधीनीनें मनापासुनी माया)

कोटिदिनमणी प्रकाश जैसा तैसीनञ्जु सांवळी दिसे सुप्रकाशित कोंवळी॥ कोटिमदनमूर्ति त्या सुशोभित त्याहुनिती चांगली, नयनिं मूःतींनी अवलोकिली॥ नंद भाग्य उइवलें रा जा दृष्टि चकित जाहली॥ तुझा शौर्याचि सिमा राहिली॥

मारवी—दु.

तुमचा अरि निश्चयें जाणिला अझी त्या पुत्राशी त्याहस्तें घात तो होये सर्व हि असुर कुलाशीं:

१ अमतो दवडावा; सदू पाय त्या योजावा

"महाराज! नंदराजास पुत्र झाला आहे त्याची"
"कांती कोटिसूर्य प्रकाशा सारिखी, वत्याचें रूप कोटि"
"मदनमुर्ति सारिखें सुरूप आहे, तें रत्न पाहातांच"
"आमचे नेत्र तरळले आणि वाटलें कीं असुरकुल हा"
"नी त्याचा पुत्र आहे स्त्रें होणार.

कंसासुर— गीती

मूर्ख सर्व मज गमतें, नाहीं कोणी सखा मला

वाली ॥ आणि महाबल येथे, दूर करी निश्चयें-
असुरवक हाली ॥

" अरे! सर्वत्र मंडळी तुझी मूर्ख आहां आणि मुख्य"
" तें तुमच्या मनांतून माझा घात करणें आहे, जा! या क्षणीं"
" त्या महाबल दैत्यास बलावून घेऊन यावें. त्याशिवाय मा"
" झीं संकटें निरसन करणार दुसरा कोणी नाहीं.

महाबल दैत्य येतो. कंसमा
नानंतर प्रश्नाचें उत्तर-
सारखी दुसरी.

स्वामी मजला आज्ञा करणें सिद्ध असें हे वेळा,
सिद्ध करूनि कार्य मी सत्वर येतों दर्शनाला,
आज्ञा मज द्यावी; विनंती स्वामींनी पाहावी.

" महाराज काय आज्ञा असेल ती मला करण्यास संश"
" य घेऊं नये. जर स्वामींचे चरण कृपा असली तर, हा दास इच्छे"
" प्रमाणें कार्य सिद्ध करून चरण दर्शनास क्षणमात्रें वि"
" जयी होऊन येईन, महाराज! विलंब न लावितां आज्ञा"
" द्यावी.

कंसासुर.
( साधवा योग्य तुला हें. )

रक्षीरक्षीमजमैत्रा, संकटापासूनी ॥ धृ ॥ न
भवाणिनीसत्यजाली, बुधीतुझितीनमा
निली, परिपरिणामीरेस्मरली, गोष्टिटळ
ळीवेळानी ॥ १ ॥ नंदराजाशींपुत्रझाला, धा
कनोपडलाबहुमजला, जीवनोत्रमिमा
झाजाला, मनिंगमलामहाप्रळय ॥ २ ॥

१ "अरेपरममित्रा! तुझीसांगीतलेलीबुधीम्यां"
"ऐकिलीयायोगानेंपरिणामसर्ववायीटघडला, परंतु"
"आत्मपश्चात्तापहोऊनकांहीउपयोगनाही, कांकी"
"वेळाटळली, आणि भवानीलासत्यपणाआला.

२ "मणसख्या! नंदराजासपुत्रझाल्याचीबातमी"
"माझाहेरानीआणिली, यावेळेपासूनमाझेंमनअसें"
"भ्रमीतहोऊनगेलेंआहेकींजासनाआवरयेण्यासतु"
" जवांचूनकोणीउपायकरणारसमर्थनाही.

पराक्रमवर्णनकरूनदैत्यजातोवत्या
सघालवीतसर्वजातात

प्रवेश ८ वा

गोकुळ

नंदराजाचेंगृह.

अवश्यअसणारीनाटकपात्रें
नंदराजा१ महादबा२ नांगोजीपाटि
ल३ यशोदा४ कृष्ण५ गवळी६ महा
बळभट७ सखुबायी८ चोपदार९ अ
न्नपुर्णाबायी१० गोपीकाबायी११
नंद.वगैरेकचेरींतबसलेआहेत

नंदभाषण
: व्यर्थयाजन्मासि:
आलों

व्यर्थयाजन्मासिआलोंऐसेंवाटेमनादीशा
व्य॥ काहिंसौख्यलाभाचीमजलानाहींसे
मुळींआशारे व्य॥ ध्रु॥ धनकांतासुखइत
रबहुतें, परिनाहीमजमनामानतें, असो
ख्यतें यापरतें, भरतेआलें सर्वविनाशा
॥१॥ प्राणप्रियातीअसेगर्भिणी, ध्यासअ
सेतोनिशिदिनिसुमनी; परीकायपरि
णामी, माझीपुरावेदेवचिन्ताशारे॥

“ नांगोजीपाटिल! कायरावसांगाव! येटेंदैव
“चपर्तीकुळ; हेरगायोहेती, झशीहेता, बैलटोणगे म

"उयहैन, पनबेटें पोरगेंनां हीझ्मणुन शानीलै चि नालागः
"ती- महादबा! आतांमानर देयान परसंग आंटला."
" कारन, घरकरीन पोटाशीं हाये, कायजनु पोरगा होयी"
" लकी. पोरगी हायील. बरें दैव हये.

महादबा-

" पाटीलबुवा असें कायझ्मणता! देवकायपेडा हये;"
"काइएइ ये! अवो! जथें समदींसुखें है नी नथें कायपोर"
होणारनाहीं जाउंद्यायाव.

अंतरगृहांतून सेवक निरोप घेऊन
येतात. बरामराम करून विनंती
(कितीधालुशीमें)
(श्रुति)

महाराजा अज भाग्यउदय जहाला, सर्व-
सौख्यजाहलें त्रिजगाला।। मेघवर्षिनीउन
महेमाला, वायुसीतलमंद दशा दिशाला।। रा
णिमहाराजाशीपुत्रझाला, कोटिसूर्यवत
प्रकाशतो पडला, नागरिकांशीं अनीहरुष
जहाला, गोपजनीं विजयध्वजउभारला
" महाराज आपणासपुत्र झालाआहे याचीकांनी"

"कितीवर्णावी, कीं, कोटीसूर्याचाजेसाप्रकाशतदून"
"यापुत्राचेंरूपमनोहरःपप्रकाशितआहे. जावेळेस"
"पुत्रजन्मझाला, त्यावेळेपासून सुवर्ण वृष्टीमेघानी"
"चालविली आहे. व दशदिशासोज्वळ. सीतळ,वंद"
"वायुने व्याप्त आहेत, महाराज थोड क्यांत सांगतों की"
"हापुत्रपरमेश्वरी अवतार सर्वआपले संकटाचाभार"
"हरण करण्या करितां झाला आहे.

शर्करावाटण्यास आज्ञा करिता
त,ववाद्येंवाजविण्याससांगता
ततेंसर्वमहकूफ जाल्यावर

" मी शेवट करण्यास अवकाश लावणार नाहीं.

चोपदार-

" राजाधिराज, महाराज, सबराजनके सिरताज, द "
" गाचा ज मोहताज नंदराजकी अस्वारी द्वारे खडीहै. हो "
" कमहोयतो अंदर छोडूंगा.

कंस

" येऊंदे किरे बेट्या, त्याचें तर आज फार काम आहे "
" (प्रधानाकडे) कायहो चाणूर प्रधानजी बोललोंही "
" गोष्ट सत्य आहे कीं नाहीं? त्यादेखत कोणी कांहीं बो
" लूनका.

नंदराजा आंत आल्यावर ना
जिम तवाना झाल्यावर

कंस

" यातुह्मीं पाटिल बुवा, तुह्मीं मोठे मनुष्य झालेत "
" आतां तुह्मीं आमचे सारख्यास कशास विचाराल? "
" अहो आमचा करभार पाठविण्यास विलंब लागला "
" तर त्याची कांहीं चिंता नाहीं. दुर्लक्ष करता येईल. परंतु "
" त्यास मुलगा झाला त्या विशीं तर खुशालीचे पेढे अ "

"सावेकींनाही?

नंद

दरबारांतशुध्धभाषाबोलतो

(कांहींबोलामहाराज)

क्षमाकरामहाराज. नतसेवकमी.दीन असेंतोनाहिंदु जेमजकाज)स्वामिचरणमनि अणुनवर्ततो. तसरमी महाराज. समागमेंक रभार आणिला. मानुनि तुह्मां सिरताज. क्ष माकरा ॥१॥

पुत्ररत्नम्यास्वामिकृपेनें ईशप्रसादें पाहि लें.नपरतें भेटीसि आणिलीं अवलोकावीआ ज,क्षमाकरा ॥२॥

दामोदरप्रभुरक्षो प्रभुशीं,तोसंर्वांयशदा ता,दीर्घायुषतो दें वोपुत्रा रक्षो अमुचीलाज; क्षमा करा ॥३॥

१ "राजाधिराज, मीआपलानतसेवकस्वामींचर"
"णावर दृष्टी देऊन कालक्रमितों, मीस्वामीससकलज"
"नामध्यें श्रेष्ठ असें समजतों. वमी कांहीं एक स्वामी"
"चरणाशिवायदुसरें समजतनाहीं, असोतरकऊ,

" जीस्वामीनी ही आज्ञा केली ती तर टिकत आहे. परंतु से
" वकाचे हस्तें अशी गोष्ट घडणें नाहीं. कोण आहे रे तां तो
" करभार इकडे आणा ( ठेवल्यावर पुढें ठेईन मुजरा करतो
२ " महाराज, ईश्वर साहें, व स्वामी कृपाकटाक्षानें त्यापु
" ररत्न पाहिलें. व त्याउ साहाणीसर्थ स्वामीस रत्नें भे
" टीस आणिली आहेत. स्वीकार करावा ( महादबाकडे )
" महादबा, महाराजाकरितां जीं असुत्सरत्नें आणिलीं
" आहेत. तीं येथे घेऊन यावरें ! आण त्यावर पुढें ठेवितो
" व मुजरा करितो.

मराठी ग्रंथ संग्रहा ठाणे

## कंसासुर
### गीती

शाबास नंद राजा. शुभमती असाशतृ
सुसेवकसा. ऐशा नरास समयीं. मानिन
भक्तांनतो चिदेवकसा ॥१॥
चिरायुषी तो होवो. आशिर्वादें करूनि
यां माझा ॥ हर तिलक ष्ट सकल ही. सिधी
होइल मनांनलीनृ ज्ञा ॥२॥

" पाटील बुवा, शाबास शाबास. सेवक असा
" वानर असाच असावा असा स्वामीतत्पर तूं त्यास

"परमेश्वर कसाबरें उत्कटपा होईल. बरें पाटिलबुवा. पर"
"मेश्वरानें आपल्यास पूर्णमनानें चिरायुषी करून अखंड"
"ऐश्वर्य द्यावें."

पद
(उधोजीथारीमन की मनमेंरही)

महाराजा जातों अतां स्वगृहाशीं. वंदन प्रभुचरणाशींमहाराजा ॥ धृ ॥ ममता असावी मजदीना वरि, तत्परस्वामी कार्याशीं महा ॥१॥

होयिन तत्पर स्वामिचरणापुढें. पाचारण केल्याशीं महाराजा ॥२॥

दामोदर प्रभुसुकृपाकटाक्षें, पाहो कीं स्वामीशीं. महाराजा ॥३॥

"महाराज, मी वंदन करितो, व स्वगृहास जाण्या"
"विषयींची आज्ञा मागतों. मजदीनावर स्वामीची निरंत"
रकृपादृष्टी असावी.

"महाराज जा वेळेस सेवकास आज्ञा करा"
"त्यावेळेस चरणासंनिध येईन. व कार्यांत तत्पर"
"राहीन.

३" दामोदरप्रभु, महाराज आपल्यास कृपादृष्टीनेनि,,
"रंतर अवलोकन करो.

नमन करून जातो. इतक्यात गो
कुळांतील दूत येऊन स्तब्ध उभे
रहातात ते पाहून
कंस
(केशवकरणी अघटित)

कायजहालें कांहिं कळेना. भ्रमले सकल
हि अतां. भ्रमले २ लागलीत ळमकळम जलावृ
था॥ मूर्ख जहाले सर्व हि जन ते हृदयींजडली
व्यथा. हृदयींजडली २ नाहिं रणवीरनि अन
कूल ना॥ सेवक कांहे स्तब्धचिं झाले कळवि
तिन चिनी कथा. कळविनि २ जाहाला गोकु
ळीं त्यां देखता

॥चाल॥ दैवप्रतिकूळता, काय करा
वें. कुठवर दुःखतें म्या सोसांवें॥ मूर्खानोतु
म्हीं मुख उघडावें ॥३॥ शिरछेद करिन
मी तुमचा वृत्तांत न ऐकतां, वृत्तांत २ याक्ष
णीं दाविन मी नीक्षितां

“ अरे देवा! काय भ्रम. या सर्वांस झालें तरी काय! को„
“णी रडत येतो. कोणी मोठ्यानें येतो. कोणी शासन सह„
“न करून पळत येतो, कोणी गोकुळास जाण्यासच धज„
“तनाहीं. व कोणीचि त्रास खिन्नतेचाच गोष्टी सांगतो„
“तेव्हां माझे सर्व सेनेसह वीर महाभूतानें झडपले. अगर„
“भ्रमान पडले, अगर झालें तरी काय.?

“ चाणूर प्रधानजी: मला असें वाटतें कीं, देवच मा„
“झेवर क्रूर आहे. कारण एका मागून एक सर्वच असें„
“ कसें झालें. कायहो! मुष्टिक प्रधानजी. त्या या दूतां„
“स गोकुळचा वृत्तांत काय होतो तो पाहून कळविण्या करि„
“ता सुदाम पूतनेच्या मागून गोकुळास पाठविलें, तेच ये„
“थें येऊन माझा सन्निधस्त उभे आहेत. आतां त्या„
“स मज जावें तरी काय! (दूतांकडे पाहून) कायरे मूर्खा„
“तो वृत्तांत कळविण्याचा मानस आहे किंवा नाहीं! जर„
“तुम्हीं वृत्तांत न सांगाल तर क्षणांत तुमचा शिरच्छेद करीन„
“हें तुम्हीं निश्चयें जाणावें.

संतापाचें भाषण ऐकून दू
त सांगूं लागतात (बेहाग)
दूत

वैसा आह्मांशीं तो समय किं प्राप्त, महाराजा चा
नतें असे विपरीत, वदण्यासीं तें मन हो कुंटित,
॥ उ॥ काय करावें प्राक्तनि आलें. ऐकावें अह्मीं
नेत्रें विलोकिलें ॥ धृ॥ पाहुनि असुचें मन कळ
वळलें. ऐकावें अह्मीं ॥ १॥

पूतना बायि ती मुकली प्राणा. कृष्णें शोषि
लें समळीं विषस्तना, राहिल्या तिच्या शौर्याच्या
ननाना ॥ उ॥ एवं प्रकारें आयुष्य सरलें, अपे
शी. आमुचे येणें किं झालें ॥ पाहुनि ॥ २॥

१ "महाराज. स्वामी आज्ञेंत वागण्यांत अह्मीं.
"ह्मणजे केवळ अंतर केलें असेल. असें मानूं नये. प.
"रंतु काय करावें. असें महाबळाच्या वेळेस आमचे
"सोबत्यांस अपेश आलें तीच वेळ सांप्रत आह्मावर
"येऊन पडली आहे. परंतु. आमच्या निरुपाय ह्मणून
"तोंडूनांत. स्वामीमनि वेदन करीतों, स्वस्त मानस
"करून ऐकावें

रागानें परमाणगी दिल्यावर
दुसऱ्या चरणाचा अर्थ

२ " आपण जी पूतना नामें हाबळा स्व असुरी पाठ्वि

“ ठी होती. ती तेथें सुंदर स्त्रीरूपानें गेली. व. शास्त्रयोग्य रीतीनें.
“ आपल्यें गवळ्यांचें अंतःकरण, वळवून. व. कृष्णास मायाला
“ वून आपल्या स्तनास लावला. तो लावितां वज्राप्रमाणें लोहचुं
“ बक जसें रक्तशोषण करितो. तद्वत पूतनेच्या स्तनांतील वि.
“ एक कृष्णानें शोषून दुग्ध ही शोषिलें आणि रक्त पिण्याचा सपा.
“ टा चालविला. तो इतका कीं, शेवटीं गतप्राण होत्साती भूमी.
“ वर पडली. तथापि कृष्ण तिच्या स्तनावरच होता.

हें वर्तमान ऐकताच. मूर्छने
ने कंस भूमीवर पडतो व-
बोलतो

कंस

(जियरा मेंके सेकरूं रे)

जगदीशा. कां रे मजवरती रुष्टलाशी. जगदीशा ॥ध्रु॥ अपराध तूझा काय म्या केला. रुष्टला कां रे देवा मनिं तूं धरीशी. जगदीशा ॥१॥ हरयुक्तीनें अरिक्षय करणें. उक्ति कीं ऐसें देवा. असें सरोशी. जगदीशा ॥२॥ आशा होती बहु पूतनेची. परी विपरित तें झालें. रवेदतो मानसीं. जगदीशा ॥ ३

१ "हे जगन्नियंत्या, प्रभो, अरे दीनदयाळा, माझा अपराध
"काडिमात्र नसतां, व्यर्थ मला चिंतासमुद्रांत कां बरें टाकिलें…
"स, काय हे तुला योग्य आहे! अरे देवा मी दीन मजवर…
"इतका कोप कां बरें करितोस.

२ "हे देवाधिदेवा, आपल्या शत्रूचा होईल त्या प्रकारें नाश…
"करावा, असा त्रिजगामध्यें क्रम चालला असून, त्या प्र…
"माणें म्यांही आपल्या शत्रूच्या नाशासाठीं प्रयत्न केला अ…
"सतां मजवर अवकृपेची छाया कां करितोस, हे प्रभो, दा…
"सींचीं संकटें टाकणारा, असें ब्रिद वागवून मजवर हा आ…
"कांत कां गुजरवितोस.

३ "अरे देवा; काय सांगू, त्या पूतनेविषयीं चीं मला…
"फारच आशा होती, त्या महाबला जवळ तिचा विजय…
"यासी विषयीं, काय काय प्रतिज्ञा केल्या होत्या, त्या सर्व…
"वृथा गेल्या, आतां म्यां काय करावें, जा शत्रूनें पूतनेसारि…
"खी बलाढ्य आसुरी क्षणांत मारिली, त्या शत्रूचा म्या परा…
"क्रम त्रिलोकांत आणावा! आहा कर्म कसें वाकडें आहे
"सर्व गोष्टी विपरीत घडून येत आहे.

महाबल
सारथी

महाराजा तुह्मिं स्वस्थ असावें, त्याग वीति उदासी. हरयुक्तीकरूनियां टाकूं कृष्णा मृत्यु पाशीं ॥१॥ असे कपटि अरिसर्व समजलेंन साकरूं,तो योग; परीमाण त्याचा तो हरुनी, सा धूं सुखप्रयोग ॥२॥

"महाराज; आपण सर्व गोष्टी विषयीं समर्थ असू."
"न अशीं अस्थिरपणाचीं अप्रयोजक भाषणें का बरें करितां."
"अहो,आह्मी पक्कें जाणतों कीं; आपला शत्रू परम कपटी आहे."
"तेव्हां त्यास मृत्युपाशांत अडकविण्यास तसाच कांहीं योग."
"केला पाहिजे. महाराज! आपले पदरीं आह्मी एवढे असू."
"न जर असल्या कारस्याचा संव्हार होयीना तर मग काय?"
"स्वस्त असावें. एकवेळ आह्मीं आपले कार्यांत फसलों."
"ह्मणून वारंवार फसणेंच होयील! कधींही आपण तसें."
"समजूं नये

## कंस

"ठीक आहे, महाबला! या समयीं मला तुझें बो."
"लणें तर इतके प्रिय वाटलें कीं, जशी दुधामध्ये साखर. प."
"रंतु. आतां बोलल्याप्रमाणें वर्तणूक करण्यास अंतर क."
"रूं नका. वगा झें मन आपण. सतोषीत करावें ह्मण."

"जेझालें

सर्वअशीमसलनकरू

नस्वस्थानीजातात

प्रवेश४था

गोकुळ

नंदगृह

(अवश्य असणारींनाटकपात्रें)

नंद१ यशोदा२ गोपिकाबायी३

अनपूर्णाबायी४ महादबा५

नागजीपाटिल६ चोपदार७-

आणखींकाहींगवळी ८

प्रथमतः सर्वपूतनेचें अरिष्टनिवा
रल्यावरनागजीपाटिलासयशो
दाह्मणते

"कायबांपाटिलबुवा, हिंगझटेंनरमस्तयेसा"

"ती. अनपरानपनीतर जनुमथुरे गेले, आत्ता या रांडे"

"चेलसी अवजड शरीर कुनकड टाकावें अगरका"

"यकरावतरीकाय

महादबा

"बायीसाब, याखिनी, पाटिलबुवा आल्यावांचून"
"कंदींपनरहानारव्हायी, काजे त्यांसनी म्हायित हय्ये कीं"
"याघारावर मरनल चांडेये त्याल. झगुन शानीलघक"
"रगेलेंपाहिजे. आतांमल्रातरबा असें वाटतय कीं"
"पाटिलबुवाची वाटबगावी. अनते आल्यावरसं"
"मयागोष्टीनीटहोत्याल

## गोपिकाबायी

"कायहोयशोदाबायी. जावेळेसहीअसुरस्त्री"
"रूपानेंयेथेआलीहोती. त्यावेळेसइतकीसुरूपःदि"
"सतहोतीकीं. अह्मासर्वास असें वाटलें कीं ही स्वर्गी"
"चीदेवता आहेपण. तीरांडपूतना असेंपरिणामीस"
"मजले महादेवा. काय त्यारांडेचेंशरीर. कसें ही"
"असो. आज कृष्णावरील दुसरा अनर्थटळला"
"असें म्हणण्यासकायचिंता! यशोदाबायी! याम्नु"
"चीएकवेळ दृष्टउतरावी असें माझ्यामनात आहे

## अनपूर्णाबायी

"खरें खरेंह्मंगतां गोपिकाबायी. मी आतांच जाउन"
"शनीदृष्टीचेसंमदें सामान आनित्ये. अनपूर्णाबा"
"यीत्वरेने घरांतून कांहीं मोहर्‍या. मिठ. मिरचा व"

"चार निखारे कवलांत आणून गोपिकाबायीजवळ ठेविते)
"गोपिकाबायी. हे ध्यासं मदे सामान. अन काय तुम चें कर.,
"नेंते कराकी.

गोपिकाबायी

"एका हातांत मीठ. वदुसऱ्या हातांत मोहऱ्या. घेऊं.
"न कृष्णावरून ओंवाळून विस्तवावर टाकते. व म्हणते.
"इष्ट मिष्ट. कोण्या रांडेची अगर मेल्याची दृष्ट. जको.
"न मेल्याचे कष्ट. मेल्याचे अगर त्या रांडेचे तळपट होयील.
"असें देवा कर. ने देवा. या मुलाचे बरें कर! यशोदाबा.
"यी कशी त्या दृष्टीस घाणयेते पाहिलीन नाही जवळ दे.,
"खील बसवत नाहीं.

चोपदार ओरडत येतो. बायीसाहेब. महाराज आले. मोठ्या आनंदांत दिसतात. (सर्व उठतात) नंद दरवाज्यांत येतो. आणि म्हणतो–

"अग बया! हे कुन कुंटल चांड आलेय. बबब.,
"बब, काय हें अरिष्ट. अरे प्यार कुठे हय्ये! मीतर.,
"मथुरेस गेलों होतों. मला ठाउक नव्हायी.

## नागजीपाटील

"पाटिलबुवा! तीबायीजवां आलीनेव्हां अपुनत्तर"
"इत होतांच. पन अपुन जवां गेलेत. तवाच आपल्याकु"
"स्याला तिणे थानाशी धरलें, अनबुवा कायझाले असें"
"लते असू. पन त्यापोरानेच तिचापरान घेतला. दिसरेत"
"एकायसांगू. पनजवांनी जमिनीवर पलडीतवां, असा"
"कांहीं आवाजमोठा झाला कीं, समदे घावरलों, अननी"
"जरीपलडीतरी हें धार थानावरुच होतें. परमेसरान"
"अशी किरपा केली अन खिनभरान देवानुच जवां संधी"
"दिलीतवांच आह्मींसमदयांनीं मिळून शनें अदोगर च्यार"
"ओलदें.

## श्लोक

## गोपिकाबायी

पचेना चित्तीउत्तमा वस्तु कोणा, अशीती असे सर्वही स्तूणजाणा, तसा कृष्णा हा रत्नहें होअलभ्य, करूदेवतो सुकृपें नुजसि लभ्य॥

" अहो यशोदाबायी, परि वारान असें आहे कीं"
"चांगली वस्तू कोणासचा जिरू सकत नाहीं, नाना प्रका"
"रच्यो त्याविषयींसंकटें पडलात; आणि हा कृष्ण हें"

"नरमूर्तिमंनरत्न आहेयावरनरसर्वब्रह्मांडांतील संकटेंतुटून
"पडणारच. बरेंदेवयाचेंरक्षणकरो.

नंद

(आलावनमाकिरावी)

दैवगतीऽदृष्टह्मणुनि पुत्ररत्नलाभलें, सांक डेंतेंदेव राया तुजलागींतेंअर्लें; दुष्ट विघ्नत्या चिकृपेंमुलावरीलवारिलें ॥ ३॥ दासावरी कृपाकेली महत्कृपेंभगवंता. तुजवीणनाही कोणी. अह्माशीतोरक्षिता ॥ धृ ॥ नकोन कोदेवाम जशिंदेउंऐशिसतत नव्यथा तुज वीण ॥ १॥

गेलोंहोतोंराजभेटी. परिहोताधाकम नी. येयिनकेव्हावाटतें,बरें आपुल्या सद नी. धाकेंमननेंकरीतकमळ कींनीशि दि नीं, ॥ ३॥ दयाकरीदेवासांगे मजाशिको णदुजात्राता तुजवीण॥२॥

"हे प्रभोकायनरी हाभयंकरमजवरमसंग
"भाला आहेजावेळेस यामुलावरप्रथमसंकट आ
"लेतें त्यादयेनेदुर केलेस तेंहाचम लावालेंकी

"जरतुझी कृपा असली तर या पुत्राची आशा, नाहींतर"
"ह्याकायकरावयाचें होतें. हे जगनियंत्या तुजवांचू"
"न मला दुसरा कोणत्राता आहे. यम्याप्रसंगी दुसऱ्या"
"कोणास ध्यावें! येक संकट दूर होत आहे तों दुसरें मा"
"गून आलें अशीं वरचेवर देवा संकटें आणल्यास मा"
"झा बचाव कोणत्या रीतीनें बरें होयील. ह्मणून कृपा क"
"र आणि इतःपर विघ्न आणूंच नको
२ "हे दीनोधरणा; दीनदयाळा; मी संकाळी मथु"
"रेस राजसभे टीस गेलों. आणि तेथें पोंचलों त्याच वेळे सम"
"ला असें वाटूं लागलें कीं देवा मी आपलें घर केव्हा पाही"
"न. कांकीं मला डाउकच कीं कंसासुर जो माझा राशी"
"स लागला आहे. तो आपला कि वा माझा अंत केल्या"
"शिवाय । सुटणार नाही. आतां देवा प्रसंगीं बुधिदा"
"ता तूंच आहेस. मी आपल्या मुलाला कोणत्या प्रका"
"रें रक्षावा तें तरी सांग ह्मणजे त्याप्रमाणें वर्तणूक करी"
"न. असुमहादेवानें चारू इट आना अनमलात्याचामुकापयुंबा"

## महादेबा.

"बाबीसाब! ध्यार घ्याकी इकड (नंदाजवळ"
"ठण देये. ब्रह्मणतो) पाटिलबुवा हा चारलघीरू"

“ चांडाळा हृथ्ये. परमेसर. अनयामदी काइ फेरना हो. बा.”
“ हा! कायतुला त्याराखसनीचा अभाग्याडलु यीला ग.”
“ हा (कृष्ण हसतो). पयापया. फारकसें हसतुय.

नंद

“ बाळा. हालल बाडा. आतम्याला होतास की.”
“ अरे बरें तुला त्याराखसनीनें सोडलें. बाळा तुला माई.”
“ बीचार वर्षे जाऊन पन बाबा अखंड आयुष्याचा हो.”
“ (मुके घेतो लाड करितो) नागजी पाटिलय, अनो का.”
“ बोबालाना, यासमद्या बायासनी वेसबेसलुगडी.”
“ चोल्याद्या अनसमद्या आपल्या लोकासनी मुडाशी.”
“ बांधा (आज्ञेप्रमाणें झाल्यावर) बाबानो आतां त्या.”
“ रांडेचे शरीर ल्याडा. अन टुकडे टुकडे करून शानेगा.”
“ बाबा हीर टाकुन द्या. (त्याप्रमाणें करितात) पा.”
“ टिलचला की आतांचा वडीघर चार गप्पा झो ओन.”
“ बसू.

सर्वनिघून जातात

महाबळ भट्टाची विटंबन, व पूतना प्राणहरण, हे दोन भा-
गयेथपर्यंत साद्यंत झाले, आतां यापुढें बाल क्रीडा.

"ह्मणूननामठेवुन तिसऱ्याभागास आरंभकरीतों ह्याव॰
"कृष्णाचेंवय ७ वर्षांचें होयीतेथपर्यंतलीला वर्णिली॰
"जायील. याबालक्रीडेंतच राधाविलासाचेंचरित्र अ॰
"वलोकनांत येयील.

श्री

# बालक्रीडा

## सूत्रधार.

"नटा! पूर्वीचा दोन भागांत यज्ञ बलभद्र विटंबन,,
"वपूतनाप्राण शोषण हे दोन भाग नाटकरीतीने यथाम,,
"तीजनांस करून दाखविले. आतां माझा हेतू असा आ,,
"हे कीं कृष्णाने जी गोकुळांत बाळक्रीडा केली आहे तो,,
"चमत्कार किंचित दाखवावा, परंतु माझी इच्छा पूर्वीं,,
"तुला प्रदर्शित करण्याचे कारण काय? हा प्रकार जनास,,
"पसंत पडेल किंवा नाही या विषयीं तु झें मत द्यावें.

## नट

"नाटकाचार्य मी तुझाला हात जोडतो. कां की,,
"हे दोन भाग पुरे होताना माझ्या छातींतून ३ शेर रक्त,,
"पडलें. आणि यमाजीपंतांकडील चिट्या ३ वेळ फि,,
"रविल्या. तथापि अजून मजवर तुझी सक्ती करितां,,
"कायकुकटचें घालाल जेउं तर बापलेंक दोघे ही,,
"येई" अशा प्रमाणें मी आपला बिनपगारी मिळा,,
"लो म्हणून काय नागरास चजुंपणे आरंभिले हे योग्य नाही,,

## सूत्रधार-

## श्लोक

॥मने दोनची एक. कार्या मिळाली. तरी सि
धनासर्वहीजाणजाली॥ ह्मणूनीतुवां राख
णे एक चिंता॥ त्यजीसर्व हीतीमनीचीअ
हंता॥१॥

"अरे. नाटक विभूषित करणाऱ्यानटा ! पंडि"
"तांत असें आहे कीं. दानमने जर कोणत्याही कार्या"
"स एक चित्ताने अनुसरून आहेत तरतें कार्य सिध्दीस"
"चांगलें असें जाणलें पाहिजे. ह्मणून आपली अहंता"
"सोडून माझ्या बोलण्यावर लक्ष देऊ. आणि आपण ए"
"क चित्ताने आपले कर्तृत्व करू."

## विदूषक

"हंहं. नाटकाचार्या इतका वेळ पावेतो मी किं"
"चित उमजलों माअ होतों परंतु आतां सर्व समज"
"लों कीं तुह्मी माझ्या साह्याविषयीं उद्योग करितो मी"
"संतोषतेनें तुह्मास करणार आपले जवळ गुण"
"असेल तोतो द्यावयास चिंता काय आहे. हं, हो"
"उद्या. अहो सूत्रधार आतां उशीर कशास क"
"रिता."

प्रवेश १ ला
स्थळ—गोकुळ
नंदगृह
(अवश्य असणारी नाटकपात्रें- )
नंद १ यशोदा २ गोपिकाबायी ३
आनंदीबायी ४ अन्नपूर्णाबा
यी ५ चोपदार ६ महादबा ७ ना
गजीपाटिल ८ कुबड्या ९ याक
ड्या १० राधा ११
यशोदाबायी कृष्णास पाळण्या
न घालून झोंपा काढीत आहे
गाणें
(तारकनूं हरि अज्ञादीनोक्षरणा)
जो जो जो जो जो जो निजनू बाळा. दर्पनु झा
ती होवो या कळिकाळा. जगदीशा पूर्णकृ
पें रक्षीयाला. समर्थ असती देवा जगत्प-
तिपाळा. जो जो जो ॥ १ ॥
नवजन्माचा सर्वा आनंद थोर. चोरचु
कला अमुचा सकळ हि घोर. अनंदवी

तूं अमुचा देवाकुमर. जोजोजो॥२॥

एकनाचनवजन्मा. धाकनिवैरी, आ लाआलाह्मणतीः अमुचावैरी. कंसासुरतो धाकेंनिजअंतरी. जोजोजो॥३॥

निसरेंकडवेंपुरतें हातआ
हेतों चतुर्भुजपीतांबर धा
रीकृष्णामुनींपाळण्याबाहेर
दिसलीव हातींसुदर्शन अ
सून (प्रियेचारुशीलें)

अनांका यवदसी अर्जुनसागमांत. कं सभीतीकशी सांगमांतें, पाडल्याचामला कांवृथाभयतुला. वधकरीयाक्षणीमा नितचितें. अनांका॥१॥

कायत्याचेंभय, होमनींनिर्भय. देव मीनिश्चय उदरिं आलों. मानितूंसुंदरी भीतिनचिअंतरी. जाणवधहेतुनेंखरि नगेलों॥२॥

१ "(मोह्यास्वसने) हेमानेकायतुला झालें.तं॥ "रीकाय, कोणमोह्याहेंहेंआ अर्जुन ओळखीलें

" नाहींस! कंस धाकड्यण नेप वार्थ काय! जसा अग्नीशु"
" ते तृण भारा तसा इत माझ्या पुढें कंस याची भीती तुझ्या सिज्ञ"
" सकुशास पाहिजे. एकाच क्षणांत मी त्याचा वध करीन"
" सोड सोड. तूं काळ जीया क्षणी सोडून दे. (कृष्णास यशो"
" दा घेते)

नंद वगैरे सर्व आंत येतात त्यांस व
र्तमान कळल्यानंतर

नंद

" महादेवा! या पोराने तर अनर्थ मांडला. असे उग"
" चरर डुन पराने सोडितो य, समदें तरी घेऊन शाने पघा"
" काय तरी दोड. (ज वळ बोलाविते) बाबा मथर येतुस"
" हिंग न्हायी ह्मन तो की (याप्रमाणे सर्वांनी बोलें "
" गजे म गराधा ही कृष्णास बलावते, व ह्मणते.

राधा

(मजकृपणाचें धन)

येरे येरे बाळा कृष्णा सगुणा. कांरे उगा शोये
योगा ध्यांना. सर्वांचा प्रिय मानस भूषणा. कां
रे रड शी तूं मधुसुदना।। अपुल्या बळें संव्हारि
ले [illegible] स्ववदना।।

गाऊ ॥ जरि माझा जवळी हरि येशी. तरि तुज नेइं मी अपुल्या गृ हासी ॥ धृ ॥ वंदन करिन मि नव चरणाशीं. नेयिं तुला अपुल्या सदनाशीं ॥

"हे कृष्णा, बाळा, तूं आम्हांस बोलत: करणाचें प्रियभू"
"षण असें असून त्या सर्वांची मानसें खिन्न करावी असें का"
"य रे करितोस? अरे आयीकडे आहेस नेथें तुला असु"
"ख कोठचें? गोपिका व अन्नपूर्णाबायी घेऊन होत्या त्या"
"चा जवळ कां बरे गेला नाहीस, अरे त्यां लीला करी"
"तानांच पूतनेचा प्राण घेतलास, अशीं संकटें निवारण"
"करून इष्ट आप्तांचीं मनें दुखविणें हें तुला कोणी शि"
"कविलें! अं, माझा जवळ तरी येतोस, ये! जर येशील तर"
"मी तुला घरी नेयीन, कदुधदहीं लोणी देयीन बरे? ("
"हें ऐकतांच कृष्ण उगा राहून तिकडे वळतो. हे पाहून"
" नंदराजा:

## नंदराजा
### (दुबळीला धन सांपडलें)

कायन वलप हा ज हालें हो. चिन्ता सिंधिचि
त चि गमलें ॥ बाळ कसें उगें तेरा हिलें. सक
ळांनिं समस्त किं पाहिलें. सर्व मन तें तोषित

न हालें, बाळ राधेकडे घरीं गेलें ॥ ३ ॥ नेथि
अतां राधेगे त्यासी, संतोषें तूं स्वगृहासी ॥ धृ ॥
कृष्णामाझा भावत्यातुं जसी, नेयी तूं त्या स्वगृ
हासी ॥ १ ॥

"अरे बेट्या, कायहें नवल ! अझ्मापर येईना, आई
"परवीजायना अनें राधेपर सुखासंतोषानें गेला, बरें
"काहोयिना। कृष्णा जा राधे कडे जा, संध्याकाळी घ
"रीये; राधे! जा आमचा बाळाला घरी घेऊन श्गानेऊं
"गारहिला म्हणजे आनद.

राधा

"हुकुम महाराज, आपली आज्ञा शिरसावंद्य
"आहे, कांबाई साहेब! आपली आज्ञा आहेना! मीअ
"गऊशानें आणून पोंचवीन. ( राधा कृष्णास घरीं
घेऊन जाते).

प्रवेश २ रा

राधागृह

(अवश्य असणारीं नाटकपात्रें)

राधा १ कृष्ण २ अनया ३. ( राधेचा न
वरा.) चिमणो ४ ( सासु)

कडेवर कृष्णास घेउन घरीं आली
पाहून तिची सासु

"आं राधे! कुठें गेली होतीस, अगनुं जवळ ग"
"कृष्ण कशुन आला? (कृष्णास) येयेये कृष्णा! बाळा"
"मजजवळ येतोस काय? (अंग चढवित्यावर) राधे! कां"
"हीभान असल्यास त्यावर गोड सकाळचें हें हीं घालून"
"कृष्णास एकीकडे नेउन भरीव. वमी आतां धुणी धुया"
"वयास जायें हो (जाये).

राधा

(दारास कडी घालून कृष्णास भर विसे. व कृष्णमूर्ती पाहून सकामअंत: करणाने ह्मणत्ये.)
(गृहीं पती वांचुनी काय करावें)

नसे मजसारिखी कुठे भाग्यहीन, काय करावे सुरूप असोन; जळो असोनी या मजशी यौवन, नाहीं जरि भोगण्या कृष्ण निधान ।।
उ।। कैसें करूं अतां पाचकनि आलें,हो. भाग्य नष्ट झालें, दैवाभाग्य२ दुख अनुभवितें, काय न हालें भाग्य ।।१।।

जरि थोर असता हा जगजेठी; तरी घालि
येंमी कंठीं नीमिठी, करित्ये सुखानें विषया
चा गोष्टी ॥३॥ परि तें सर्व ही विपरित्त जालें
हो, भाग्य नष्ट जालें ॥२॥

१ " कायप्रारब्ध माझें जगदीश्वरा, अरे आही डोळे "
" कसे मिटलेस. माझा शरीराचा मदनाने असा अग्नि "
" होत आहे कीं, ज्या प्रमाणें मी नउदका साठीं तळमळ "
" त असतो. माझा तारुण्यास, व सुंदर रूपास अग्नि "
" कां लागेना; अरे ह्या जीवास इच्छित वस्तूचा लाग ज्ञा "
" ला असता नरच सार्थकता होती.

२ " हे जगन्नियंत्या प्रभो. त्यां माझें अद्यापि अंतः "
" करण ओळखिले नाहींस! आहा हा, जर मोठा असता "
" सततरयाण कांतस्थळामध्ये तुजशीं रममाण झालें "
" असते व इच्छा परिपूर्ण करून घेतली असती, परं "
" तु असमाझें प्रारब्ध कुठुन उदयास येणार! मी दै "
" वांची करंटीच आहे.

कृष्णा

हें ( राधा भाषण ऐकतांच कृष्णामो
टा होता, त्यास पाहतांच राधाचेर

णावरमस्तकठेविऱ्ये) कृष्णभाषण
(फागनके दिनचार सखीरी)
हेंनुतुझाजाणुनिमी राधे घेंठरूप तें यास्थविं धरिलें ॥ धृ॥ भीतीनमनीं,क्रीडेमजशीं,इछि तसर्वहि म्यातुज दिधलें, घेठ॥१॥ कोणतुं राधे असशीमनांतरिं, शोधुनिनचित्तिंधांअजु नीपाहिलें, घेठ ॥२॥ राधाकृष्णासकलज नगाती, राधे होय मनी त्वाआणिलें, घेठ रूपतें ॥३॥

१ "अगे प्राणप्रियें राधे! तुझें हें इंगित समजूनच"
"म्या श्रीठरूप धारण केलें आहे. आतां मन मानती मज"
"समागमें क्रीडा करून आपले मनोरथ पुरे करून घे.

२ " राधे,अगे प्रियें तूं वमी कोणया चामनांत नीट"
"पणे विचार अद्यापि वाकलासना हीं, व व्यर्थ उत्तमा"
"करितेस.

३ " हे प्रियें तूं कांहीं काळ जीकरून को या त्रिजग"
"तामध्यें मी आपल्यास राधाकृष्ण ह्मणवून तुझी धन्यता"
" करीन.

राधा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

(बावरीबन आयी तु जेकिने)

ज्ञानि असे बइमानी, कृष्णा, पुरुषाची हें आले कि ध्यानी ॥ध्रु॥ बहुकपटानें गों वि त्ति-नारी नादीं याला वोनी, शेवटिं अंतर देती यांला कपटपाशि अडकवुनी, कृष्णा आले किं ॥१॥ गायननादें भ्रम विति पारधि पाशामध्यें हरणी, शेवटिं हरिती प्राण न यांचा, तीक्ष्ण शस्त्र घेउनी, कृष्णा ॥२॥ तैसें स्त्रि-यांशीं ला विति व्यसनीं नाना युक्ती करुनी, कार्यसिधि जाल्यावर त्याशीं देति कूपिं ढकलोनी, कृष्णा आ ॥३॥

१ " कृष्णनाथा, अरे हें सर्व मी मनांमध्यें जाणतें,, " परंतु वारंवार चित्तास उदासीनता होती. तोम्र कारण अ,, " सा कीं, पुरुषाची जात बेमान असती. ते स्त्रियांस क,, " पट पाशांत गुंत विण्याबद्दल नानाकपटें करितात,, " एक वेळ व्यसनांत तीं पडलीं ह्मणजे आपण दूर राह,, " तात.

२ " प्राण प्रिया दुसरें तर काय सांगूं, परंतु जाम,, " माणें फांसपारधी सुंदर हरणें गायननिमित्तानें पा,,

" शांत अडकवून त्याचे गळे तीक्ष्ण शस्त्रानें कापितात."
" तद्वतच एकवेक स्त्रियापुरुषाचा पाशांत सांपडल्या."
" म्हणजे त्यास इहपर पुरतेपणें अंतरले असें पाहून."
" त्यांस कृपान ठकरून देतात - म्हणजे त्यांस ते ठक."
" वितात.

## कृष्ण

(होरिके दिननमे तो का-)

अनृतवचनतूं राधे वदसी, जाणे सर्व मि नव हे तूशीं॥ धृ॥ स्नेह स्त्रियांचा कपटी असे तो, अनुभवत्याचा सहजी मनाशीं जाणे सर्व॥ १॥ भासे परम प्रिय प्राणप्रियाती, जाणे तनीरत परपुरुषाशीं, जाणें॥ २॥ राधे तैसे तव मानस ते, जाणवतें ते मम हृदयासीं, जाणें सर्व मि नव हे तूशीं अनृतवचन तूं राधे वदसी॥ ३॥

१ " राधे जरी तूं माझी प्राणप्रिया आहेस, त."
" री हीं वचनें सर्व तुझीं कपटाचीं आहेत. हें मी पक्कें."
" जाणितों. व स्त्रियांचा स्नेह राखण्याची कोणती रीत."
" ती असत्येती मला पुरती माहिती आहे.

१ "राधेजाशीकोण्यास्त्रीची रीती असतीत्यास असें"
"वाटत असतेंकीं काय जी मजवर प्रीती करणार तीच स्त्री हो"
"य, वरकड कोणी च नाहीं परंतु तें सर्व खोटें तीचा स्नेह"
"परपुरुषाशीं असतो. स्वार्थकी हीनी चाला घवीपणा"
"तसाच असतो. तें यास कां हीच समजत नाहीं.

२ "प्राणवल्लभे, राधे, तुझे मनांतील जें जें हे"
"तू आहे त तें सर्व माझा ध्यानात आहे. खचित तुझें"
"अंतःकरण कपटव्याप्त आहे

राधा

(आज दाखागे बायो देवय दूराज)

आणी मनि प्राणप्रियामाझे विनंती ॥ध्रु०॥
मन जालें विकलसकल शिथिल शरीर झा
लें. कष्टन ष्टकरूनि पिष्ट करिव रिष्ट प्रीती
हे प्रियामाझि ॥१॥

प्राणार्पण तु झे चरण लक्षुन तुज केला
तनमन धनकेलें आधिन तुपेक्षीतु अंती
हे प्रियाऐके ॥२॥

"हे देवाधिदेवा. जगन्नियंत्यामभां तूं सर्वां"
"चा अन्नदाता, पाणिग्रहणकर्ता, वर्तिं हता असा"

"परमसमर्थ आहेस. माझेमन विकल होऊन सर्व शरीरका"
"मजवरानें शिथिल झालें आहे. दीनदासीला कृपाकटाक्षा"
"नें अवलोकन करावें. व मनांतील दुःख हरण करावें.

"हे जगनियंत्या तुझ्याचरणासी आपलें तनमन धन"
"अर्पण केलें आहे, व त्याचरणाचीमात्र आशा धरून"
"ह्याजीव ठेविला आहे. मग आपण याउपर माझ्याकृ"
"पटंसेहे ह्मणाल तर आपलीइछा.

कृष्ण.

"बरें आहे तर राधे: जरतुला अशा आमुचा स्नेह"
"मानत असेल तर फारचांगलें (उभयतांहीनिसुखा"
"चाउपभोग करूंराधा.)

राधा

"अरे कृष्णनाथा! आजमला जन्मघेतल्याचीसा"
"फल्यता वाटली. व, माझा देह हा पावन झाला. अशी"
"च निरंतर जर कृपा केली तरमग माझ्यासुखाची बरो"
"बरी कोणीच करूं शकणार नाहीं.

कृष्ण

साखीदु॰

प्राणसखे नित्यत्यांयेऊनि आणित जासेम

ठाणे.

जला. हेतु होयपूर्णलें सिध्दीराधेमनिंजो ध
रिला. मोनीनूं वचन. नोहेक धीं अप्रमाण ॥

" अगेप्रिये, जरतुझामनोरथ पूर्णकरण्याचीइ"
"च्छातुला असलीतर मला नित्यशः तूं भरविषयाचा निमि"
"त्तानेयथें आणिनजाह्मण जे सर्व सिध्दीहोयील इतु"
"कें बोलत आहेन तों राधेचानवरा अनयाबाहेरये"
"ऊन दरवाजाठोकतो. व. बोलतो.

अनया

"अगे दरवाजाउघड, यावेंनावकायपदार"
"उघडतीसकींनाही. काय हाचमत्कार?

राधा

"पणहो. किंचितदमकांधराना, स्या आजे"
"नव्यानवसाने कृष्णा आणला आहे. भरहून दार"
"घडीन (ठीक आहे ह्य) त्यानंनर राधमाविम"
"कृष्णाकडेपाहून.

(हमसेंलरेहोरातबालम)

भयमनिंवाटतें, कायकरावें. भय. पतिशी
व्या अतां कायवदावें. कायक. ॥ धृ. ॥ जगदी
श्वरातें लाकरूनी यांपूर्वींचें रूपअपणधरा

वे. काय करावें ॥१॥ जरि रोसेनूं करिसी जरि तरि जीविस माझे मनि. वागणावें. काय ॥२॥

" अगा दीनवत्सला, प्राणप्रिया, माझ्या विनंती"
"वरूनच त्वा थोर रूप धरून माझी इच्छा तृप्ती केलीस"
"परंतु या समयीं जर तूं लहान रूप धारण केलें सतरच"
"माझा जीव वांचेल.

कृष्णानें सर्व राधेचें बोलणें ऐकून फार घाबरल्यासारखें करून राधे सही घाबर विण्यासाठीं भाषण करितो.

कृष्ण

(फागन के दिन चार सखी)

राधे कंप कि सुटला, ऐकुनि नव पतिचा हांके ला, रा ॥ धृ ॥ थोर कि झाला प्राण सखे मी ऐकुनि तव विनतीला, तव पतिचा ॥१॥ आग्रह करिसी होण्यासा ननूं परिसं कट तें मज गा. तव ॥२॥

" राधे. तुझा आग्रहानें मी थोर झालों. व तुझा"
"मनोरथ परिपूर्ण केला, परंतु साक्षणांमला नव"

"याचीहाकऐकुन कंपसुटला आहे, वयाप्रसंगीं मलातुं"
"लहानपूर्ववत होण्यास सांगत्येस परंतु मलामोठ्याचे"
"लहानहोण्याचीविद्यानाहीं, तेथेंमाझाइलाजकाय.!

## राधा

### (अतांकितितरिकरूंमनधरणी)

अतांकि तितरिकरूंमि विनवणी, तवचरणां
बुजमनिस्मरुनी, अतांकि ॥ धृ॥ जीवदा
नद्यावेंकीं मजला, दीनदयाजाणोनी. अ
तांकिति ॥१॥ अनाथाचानाथब्रिदहें का
यव्यर्थतुज असुनी, अतांकि ॥२॥ सानन
झाल्याफजितीमाझी होय अपणांकीं ध्या
नी, अतांकिति ॥३॥ हेदामोदरकरुणा
सागरदासिलीनतवचरणीं. अतां ॥४॥

१·२ "हे कृष्णानाथ, दीनपालका, मलाजीवदान"
"देउनमाझीलज्जासांभाळणारदुसरावेरं कोण आहे"
"देवा अनाथाचादयाळु हें ब्रिदतुलाकशासवरेपाहिजे"

३·४ हेदामोदरप्रभो, करुणासागर. जरआपण"
"यावेळेसपूर्वीसारिखेंलहानरूप धारणकेलें. तर"
"मजवरमोठेंसंकटपडेल, यतेंतुम्हासपहावेंलागे"

"स म्हणून चरणासजी दासीनं परनिज कर द्या करावी.

ऋष्ण

(येथीं राधे आतां)

हे प्रियवचनें हे मृगनयनें अंत:करणिं न भ्या वेंगे ॥ धृ ॥ मीतें वप्राणपती सरखें माहित पति शीं कांतें न सावेंगे. त्याशिं न भीनां मनींनू रा धे अपुल्या स्वस्थ असावेंगे ॥ हे ॥ १ ॥ सेव रिजा उनि प्राण सरखेंत्यां त्यासि द्वार उघ डावेंगे. काय करीतें तुजलानें सर्व ये कौ तुक अवलोकावेंगे ॥ २ ॥

"मला फार चमत्कार वाटतो. अगे मी तुझा"

"प्राणनाथ. हे त्या तुझ्या मरव्यान वन्यास कसें बरें स"

"मजत नाहीं. भा. आतां त्यास द्वार वाजा उघड. आणि"

"त्यास आंत येउं दे. तो आंत आल्या वर मग मला का"

"य वाटतें तें तर पाहुं दे.

राधा

(दे दे मुकुंदा निज चर)

आ नांद्या यास्रे हो सदय मज वरी ॥ आ ॥ धृ ॥ तन मन धन चरणार्पण करु नित्य दिल मि च

रण. आशा तुझिच धरिलि, हरलि शुद्धि
भ्रमलि बुद्धि श्रीहरी आ ॥१॥ व्हावें सान
कृपा करून, दयाळु तें मन करूनि आपण
शिमा अतां जहालिक हालि, दुजा नचि
वालि पडले रव्याळिं तुझा नरहरी ॥२॥

"हे जगदीश्वरा, दयाब्धे. अगा दीनपालका आतां"
"दीनसखीच्या यथार्थ अंतकांवरे पहातोस. मी आपलें"
"तनमन धन तुजला अर्पण केलें असें असतां"
"माझी हेळणा कां बरें करावीस. तुझा शि"
"वाय माझा त्राता दुसरा कोण बरें आहे, असें"
"समजून च तुझी प्रार्थना केली आहे, ह्मणून मा"
"झील ज्जा रक्षण करण्यासाठीं याच समयीं लव"
" हान व्हावें.

## कृष्णा

"बरें. आहे तर राधे, मी तुला येथडका दरवाजा उघ
" डण्याची परमाणगी दिली, तथापि तूं माझा मना
" तील हेतू कांहीच समजत नाहीस आणि तूं वेड्या
" सारिखे करितेस. तरी याच क्षणीं मी तुझा मन"
गेलुचत. आयरनो मझ्तु ळ कसनक ... धोमा

"पूर्ण करितों (कृष्ण हात होउन राधेच्या"
"माडीवर निजतों. आणि आपणतीस दरवाजा"
"उघडण्यास आज्ञा करितो.

अनया.

"कायरांड ह्याड. अद्यापि दार उघडीत नाहीं"
"अरे. तानेनेमरून गेलोना। आणि तूंतर आंतुन"
"मोठ्यान नाना चाल विल्या आहेस.

राधा

"काय हें! क्षणभर धीर कां धरानां, या येतें स"
"आंत कृष्णा शिवाय दुसरें कोण आहे तर मी भा"
"पणें चालवूं, येऊं सासु बायी मात्र असाव्या. तर"
"त्या ही गंगेवर धुणी धुण्यास गेल्या आहेत उ"
"गेच काय बोलता.

अनया.

"बरें बरें, मला सर्व माहित आहे. मी केवळ मूर्ख आ"
"हें व मला त्या शिकवावें असा अर्थ ना हीं. एकवेळ दार"
"उघड. मग चमत्कार काय असेल तो दृष्टीस पडेल. आ"
"णि आंत कोणी आहे कीं नाहीं त्याची मनीती तुला"
"ही फार लवकर कळेल (तीनि धाक पणें दार उघडु.

त्यावर आनजातो व कृष्णास पाहून ह्मणतो )

सारव्या

दीनदयाळा व्यर्थ ताडिली कठोर वचनें कांता ॥
प्रवृत्त झालों होतों देवा अतां निचा प्राणांता
॥१॥ कृष्णा यिथें होता तें मजला माहित नव्हतें
कांहीं. ह्मणुनि दुष्ट वचनें मी व दलों मनीं शो
धुनी पाहा ॥२॥ हे प्राणप्रिये क्षमा करीं म
ज झाल्या अपराधाची. व्यर्थ कल्पना माझ्या
मनिंती आली महा अघाची ॥३॥

" हे दीनदयाळा, देवा, कृष्ण यिथें आहे हें मला स"
"मात ही माहित नव्हतें. ह्मणून त्या कठोर वचनी आप"
" त्या स्त्रियेस ताडन केलें.. त्या सर्व कृत्याची म ला"
"तुज कडून क्षमा असावी. आणि हे प्राण प्रिये. तुझा"
"स्वप्नी ही पानकाचा लव क्लेश नसतां त्या तुझ्या अंगीं"
"नसता दोष लाविला, त्याची सांही क्षमा करावीस"
"आणि नित्यशः कृष्णास आपल्या घरीं घेऊन येत"
" जावे. मला मोटा आनंद होयील. ( आतां माना"
" गजीप टि करून जाऊन येतो. अमकशाने कळ"
"स घरीपोचिवबरें",

अनयाबाहेर जातो आणि
राधाकृष्णासबोलत्ये
(विभास)

जगदीश्वरारे ल ज्ञारक्षिली. हरणीशी
यांदेवा वाचवीली ॥ कीर्ति जगींत्वावीस्तृत
केली ॥ ध्रु ॥ कृपाठेवा आतांया दासीवरी. ने
त्ये अतांतु जतु झियामंदिरीं. उदित असल
कीयशोदासुंदरी ॥१॥

एका वीदे वामाझी विनंती. नित्य नित्य
यावेमाझा घराप्रती ॥ तेणे होयत्तोतोष म
नाप्रती ॥ ध्रु ॥ दीनदयाका धीरेहे अंतरीं ने
त्ये अतांतु जतु झियामंदिरीं ॥१॥

"हे जगत्प्रभो. एका अर्थीपाहातानां असें वाट"
"तें की. पाशा मध्येपडलेल्ये हरणीसवा व विष्या"
"विषयींचा तु झामोठा उपकार झाला परंतु जरमनाम"
"ध्येविचार केलातर ती गोष्ट कांहीच नाहीं. आवडत्याम"
"नुष्यास संकटांतुन सोडवावा हासर्वांचा धर्म आहे. आतां तुझी"
"आद्य यशोदातु ज विषयीमार्गप्रती क्षाकरीत असेल झ"
"णून तुझा घरींपेंच विलापा हिजे. आतां मी विनंती करि"

"त्ये ध्यान घ्यावें.

"देवाधिदेवा, माझा मनांमून असा हेतू आहे."
"कीं त्यांमाझेघरी असेंचनिरंतरशः यावेंसवम्यातुजसें,"
"गेंविषयसुखांची परीपूर्णता करून घ्यावी हा मनो,,
"रथनरसिद्धीसनेशीलतरफारचांगलें होयील.

कृष्ण

(उठिप्रभानसुमरिये)

मान दिला प्राण सरवे तुझा विनंतीला ॥धृ॥ तुझा हे तुमृपीरलव अवतार घिझा ला॥ निवसदनोंनित्य येथिन देनों वचनाला येथिराधे नित्य उषः कालिं ममगृहाला, मान दिला॥१॥

रुदन करिन सरवे जयी पाहिन मी तुज ला, कडे घेउनि आणि राधे मज शीत वगृहाला, मान दिला प्राण सरवे तुझा विनंतीला। तुझा हे तुमृपीरलव अवतार घिझाला.॥२॥

"हे प्राण प्रिये, सरवे तुझी इच्छा तृप्तकरण्य."
" स्तव म्या अवतार धरिला आहे. मी तुझा घरीं

"त्येयेतजायीन, परंतु प्रातःकाळीं त्यांमाझ्याघरीं नि"
"त्यशः यावेंस.
" हे सखे तुला मीपाहिली म्हणजे रडुन तुज जय"
" व येण्याविषयीं आज्ञा घेयीन म्हणजे आई अर्थात"
"चमला तुजजवळ देयीमआणि अशाकारणानें मि"
"त्यशः तुझी भेटी होयील. हृध्यानात वागवावें.

## प्रवेश २
## नंदगृह.
### (अवश्य असणारीं नाटकपात्रें)
### १ यशोदा २ नंद ३ आनं
### दीबाई ४ चोपदार
### कृष्णाचीवाटपहातसर्वनट
### स्थबसलेअसतां कृष्णा

" अगेप्राण सखे, सुमारे २ घटका झाल्या, कृष्णाक"
"सरा धेने आपल्या घरीं नेला आहे. त्यामुळें दुसरें नर"
" काय सांगावें मला मोठी भ्रांती पडली आहे, व. कृष्णा"
" जाईन २ घटें झालीं असें वाटतें. चोपदारास कृष्णा"
स आणि बण्याकरीतां. राधेच्याघरीं पाठवावें कीं का"

"यतेंबोल-

## यशोदा

"प्राणनाथ, माझ्या नरजीव, कृष्णभेटीकरितां अ"
"सान्याकुळ झाला आहे कीं, तें सांगतायेत नाहीं, स्तनास"
"तर तिडका लागून राहिल्या आहेत, आणि वाटतें आ"
"हे कीं मी कृष्णास स्तनाशीं धरीन, प्राणनाथ, एवढी"
"तरउत्सुकता कृष्णभेटीची आहे. परंतु मला असें वा"
"टतें कीं चोपदारास रा घेऊन घरीं पाठवूं नये. कां कीं तिला"
"तेणेंकरून फारच वाईट वाटेल असतां ती त्रास घेऊं"
"नयेईल.

## नंद

(स्वप्न आज प्राणसखे)

आणिसखे वडिरामा त्य रित जाउनी; बा
ळाविण कांहिं मला सुचेना मनीं. पाहूं दे रा
माशीं कृपा नयनीं ॥ ध्रु० ॥ उदासिनी जे हा
लि सख्ये माझिया मना, कधिं पाहिन म
म बाळ कम धूसूदना ॥ ३ ॥ जायिवें गेंउ
टें अणी ज्येष्ठ नंदना ॥ ३ ॥

कुठें रमें ना हें मन काय जहालें ; तरि

च धन्यजरीकृष्णवदनपाहिलें. पंचप्राण वाळकाासिसस्यवा हिलें ॥ ३ ॥ जिवन ळमळकोरितोस्रखेदुजें न ध्याना. जायि वेगें ॥ २ ॥

"प्राणसखे, सौभाग्यकलिके, अगे, आनंदवर्धिके"
"आपणउभयतांकृष्णावांचून व्यर्थ आहों. जाप्रमाणे"
"कोंदणामध्येंहिरानसल्यानें बिलकुल शोभादेत नाहीं"
"ह्मणून कृष्णशोभाप्रसुख होय. आतांत्याचानिज ध्या"
"समलालागला आणि यासपाहिल्यानें मला आनंदज"
"ह्मोयीलप. परंतु अत्यानंदाचाशिरोभागकृ"
"ष्णवदन पाहिल्याशिवाय व्हावयाचा नाहीं हें"
"खरे आहे

(इतक्यांत चोपदारपुकारतो)

"महाराज, राधा. कृष्णमहाराजांसकडे घरघे"
"ऊनत्वरेनेराजमंदिराकडे येत आहे. व. त्याउभयां"
"कडे मार्गस्थसकलजनतटस्थ होऊनटकमकाप"
"हात आहेत आतां आपणकृष्णाविषयीकाळ"
"जीकरूंनये

" अगेआ आणिराधपे त्याचेंनबकभरलेलें आणून "
" याचोपदारासदे आणियासंतोषाचा शब्दकरणाऱ्यां "
" त्यांचामुरव्यासगोडकरूंदे (तीलागलेच आणूनदेत्ये)
" इतक्यांत राधाकृष्णासघेउनयेत्ये. वकृष्णासयशो "
" देजवळदेत्ये)

## यशोदा
## (पायांचीरे आवडिमज )

भेटीचीरे आवडिमजगोपाला. तुझिया पुरविलिदीनदयाळातु. ॥ धृ॥ ध्यानिमनीनिजध्यासतुझारे. जिवविव्हळकीं झालातुझीया.भेटी ॥१॥ तुझियावांचुनि. कांहीनेणे. सत्यचिवदत्येतुजला.तु ॥२॥ नवनाशीयिथेघडिभरिकृष्णा. शोकातुरजिवझाला ॥ तुज ॥३॥

" अरेबाळा. मीतुजवांचुनकेवळपरदेशी "
" झाल्यें होत्यें. व. माझेजीवाचीहीमला शुद्धी "
" नवती. वस्तनासपान्हा भसासुटला होता आ
" णिइतकी अधीरीझालीहोतीकीं. स्तनाशीं—

"लाकेव्हां धरीन, परंतु जगदीश्वरानेंतो हेतू परिपूर्ण"
" केला. आतां जीव माझा इनकासंतोषी झाला आहे"
"कीं तो हर्ष पृथ्वींत ही ठेवण्यास मला जागा नाहीं."
(स्थनाशीलाविषयें). राधेनूं येथें नित्य येऊन कृष्णा"
"स आपल्या घरींनेत जावें. कुणीकडून मुलगें सुख"
" असलें ह्मणजे झालें (जाती)

(सर्व जातात.)

प्रवेश २

राधागृह

राधेने कृष्ण दुसरे दिवशीं घ
रास नेला. व संभोग परिपूर्ण ते
नंतर कृष्णास राधा ह्मणते
(कोणी घरांत दुसरे नाहीं)

भैरव राग

अवचट दाविली सखया करणी, पति
शी जाहला हर्ष मनातुनी, आज्ञा केली
मजला गौनी, सांगातलें मज नुज आण
शीं तोषविं जाहला माझिया मनाशीं

गोजी

परिचक आहे विनती. परिसावी दासिची
करूनि दया ॥ १ ॥ भ्रम वाया मम अनया.
पतिविनय पराङ्मुख मद्वृत अनया ॥ २ ॥

"अहो प्राणनाथ! काल जी आपण अवचट"
"करणी दाविली, तेणेंकरून माझ्या मनावर असा कीं"
"हा भ्रम झाला कीं त्यांनी मला तुह्मास नित्य येथें आ"
"णण्याविषयींचा निक्षुण आज्ञा केली आहे. व जों"
"पर्यंत आपण उभयता येथें आहों तोंपर्यंत त्या"
"णें येथें येणार नाहीं. ह्मणून सांगीतलें आहे."

## कृष्ण.

"बरें आहे प्राणप्रिये. परंतु ह्मा मनात असा हे"
"तू असल्यानंतर न सेंपडेल. यांत कांहीं अशक्य नाहीं"
"व. मी त्यास असा भ्रम वितों कीं तो लोटांगणें घालि"
"त मजकडे येईल. त्याची भक्ती तो पहाणें असल्या"
"स मला किंचित तान लागली आहे तर दहीं किंवा"
"दुग्ध आणून घेऊन यें."

## सूत्रधार
## गीती

शिष्यनां विद्धि यशाशी. सर्पनिघे आतून.

दृशकमुद्रा ॥ फूत्कारे राधेवरि. पडली ये उनिस
मयनिला निद्रा ॥

"नंतर. राधा जों दुधा थ्या गाडग्याजवळ गेली. तों"
"त्यांतून एक असा भयंकर दृशकमुद्राभूषित कृष्ण"
"सर्प राधेच्या अंगावर फूत्कारला. कीं तेणें करून कांहीं"
"वेळ राधा मूर्छित धरणीवर पडली. व जागृत होऊन"
" भाषण.

## राधा
### (भैरवराग)

जगदीशाकेशी प्रतिती दाविली. दासिदृशा
पहाण्या इच्छा केशि झाली. कृष्णा सर्प मला
होती अतां भक्षिली. ॥ ३ ॥ प्रतिती दावणें
त्या अनयाशीं. कैसा यदुराया तूं भूलला
सी ॥ धृ ॥ लीन मी देवा असे तव चरणाशी
प्रतिती ॥ १ ॥

" हे त्रिजगपाळा. आपण जे कोणी अनयज्ञ"
"अनेकदा परकी नाहींत. यांस मात्र प्रतिती दाखवि"
"णे योग्य. परंतु ह्या दासीच्या दृष्टीं ह्मणजे तव चरणीं"
"लीन तिला हा प्रकार कां असावा.

## कृष्ण

### श्लोक

नभीती धरीनूं सखेत्यानगाची॥ तुला स्वप्नि
याधानसे जाणसाची॥ उठेवेगिंयेयी सखे
भेटिघेयी. तुझासाठि तिष्ठे सखा जाण पा
हीं ॥१॥

"अगे राधे. तूं तर माझी प्राणसखी तुला भयाचीत"
"र काय परंतु भयाची ही बाधा होणे नाहीं, तुलव करयें"
"तुझा भेटीसाठी सिद्ध आहे ( तीयेऊन कृष्णास भेट"
"से इन क्यांत अनया बाहेर येऊन दारा शी उभा रा"
"हातो. यबोलतो.

## अनया

"अगे. मी बाहेर आलो आहे. जर कृष्ण निवात अस"
"ला नर हळूच ठेवून दार उघड. आणि रहूं लागला"
"नर तूं बैस मी जायीन

## राधा कृष्णाची सद्भावे

## ऊनउत रड्ती

" अहाहा काय हें घात झाले. अग कृष्णा रडला"
"हागून काय झाले. दरवाजा उघडतें मग कृष्णास"

"घेपीन

अनया

गीती

परब्रह्मभगवान्‌तो. रडचुंनकोगे प्रियेज गरडेल॥ याचा चुनिसकलांचा, कार्य भागतोसुनीश्चय अडेल॥१॥

"हे प्रिये. नकोनकोनको. ही अक्षरें हीयाचे वाटे"
"उच्चारलंको. कांकीतोपरब्रह्मभगवान. तोजररड"
"लानरजगास हंसण्यासकाही चसाधनरहाणारना"
"ही ( कृष्णासकडेवर घेईनद्वारउघडलेतो आंनयेतो.

कटाव

तटतटतटतट मडकलितीफुटली. कृष्णसर्पआ तुनिनिघती. दीर्घदेहपेट्यासि झोबती. फणिभयत्यासीकरुनिदावितो. फूत्कारे तेफणाफणकरिती. अनयादचकुन पडलीवा लली)(घडपडधडपड करी अनया. विस्म र झाला त्याचा अनया. यथाकाळि कांस रुनिवृत्तया, भानसर्वही गेलेविलया. श क्तिनाहीकिंचित हिनया. दीनदीनदीन

मीमजलाकृपांकटाक्षेंपाही. मरतोंमरतो मरतोनिरपराधिमीलचलाही.

"हेदीनदयाळा. मीअपराधीनसतां व्यर्थमला."
"कृष्णसर्पाची हा त्रास दिला आहे आणिसर्व."
"घरादारांत हे आलेतरीकुठून ?. दीनदयाळासो."
"डविणें असल्यासमलायादुःखांतूनवांचवावेंस.

इतकेंबोलत आहे तोंनीज
लागली.वएकाएकीकृष्णा
सशरण जाण्याविषयीचें
स्वप्नपडलें आणिखडबड्
नउठुन

स्तुती
(कैसेंकमनाउंअपने बालमसें)

आतां देवाम्यासंकटिकांरहावें. कुठव रनुजसी अळवावें ॥ धृ॥ तवदर्शनि मू कीतीहोती बंधनकामजसीव्हावें ॥१॥ तवसन्मुखच्याजगदोध्दारा. दुसऱ्या शींकीविनवावें ॥२॥
हेदामोदरकरुणासागरकृपादृष्टिनें

मजलापहावे ॥ कुठवरतुजलाम्या अळ-
वावे ॥३॥

"हेदीनोध्दरणा. तुझेचरणदर्शनानेंपनीतपाव"
"नहोनान. आणिमीनरतुझा किंकर असतां तुझेचरणा"
"सन्निध असेकष्टकसेबरेंसोसावे. अस्तु जशीइछा अ"
"सेलतसेंकर. आतांमीनर नामस्मरणी निम्नहोणार.

भजन

गोपालराधे कृष्ण गोविंद गोविंद ॥धृ॥ ब्र
ह्माविष्णूशंकर ध्यानीतूझेपदार विंद. सो
डविसोडविदीनाप्रति हापदार विंदमि
लिंद गोपाल ॥१॥ ध्यातीतुजला त्यांचे
छेदिशि भवभयसबलकुबंध. त्रिजग
म्हणुनि मि शिदिनि तेंगजे याचे बालमु
कुंद. गोपाल ॥२॥

गीती

तूं सागरकरुणेचा. म्हणुनीतुजपाशिंदै
न्यें सागावें ॥ वृथैव तें इतरांतें. दीनमुखें
म्या कशास तें गावें. ॥१॥

" हे गोपाल कृष्णा. तूं करुणेचा समुद्र त्यास "

"तुला टाकून त्या दीन मुखाने दुसऱ्याजवळ काय"
" तरी मागूं आतां. मला संकटांतून मुक्त कर. (कृष्ण"
"निजस्थाने हातवर करितो. तों सर्व सर्पनाहींसे होता"
"त. नतर राधा पतिसह वर्तमान कृष्णास आरती"
" करिते.

## भुपाळी

धन्य धन्य जगदीश्वरा. वंद्य ब्रह्मा विष्णू हरा त्रिलोकेशा करुणाकरा. जगदोद्धारा जगद्गुरो ॥१॥ नामस्मरणाचीप्रचिती आली केशीकरिशि कृपा माउली. संकट पडलें नष्ट निं झालीं. उच्चारितां नाम तुझें ॥२॥ दामोदर प्रभु करितूं सुदया. नारी शरण आल्या जोतया. विघ्नें सकल हि त्याचीं लया. पाठविदेया कृपेनें ॥३॥

समाप्त.